RNI No. MAHMAR/2015/65090

# सह्याद्री वेध
# SAHYADRI VEDH

संपादक : बोतालजी गणेश रामदास
मो.– 9970876669 Email - sahyadrivedh@gmail.com

● सातारा ● वर्ष–१० ● अंक –२७ ● सोमवार दि.१७ मार्च २०२५ ते रविवार दि.२३ मार्च २०२५ ● किंमत २ रु. ● पाने ८
● Satara ● Vol.- 10 ● Isshu- 27 ● Monday 17 March 2025 To Sunday 23 March 2025 ● Price - 2/- ● Pages- 8

## श्रीपाद जाधव, डॉ. विनोद पवार खंडाळा भूषण पुरस्काराने सन्मानित

खंडाळा : खंडाळा येथील राजेंद्र विद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम उत्सहात पार पडला. यावेळी खंडाळा भूषण पुरस्काराने पशुसंवर्धनचे सहायक आयुक्त डॉ. विनोद पवार आणि कार्यकारी अभियंता श्रीपाद जाधव यांना सन्मानित करण्यात आले. याचबरोबर कर्तृत्ववान महिलांचा सन्मान, आरोग्य शिबिर आणि गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत असे विविध उपक्रम राबवण्यात आले.

सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, राजेंद्र विद्यालय, खंडाळा इंग्लिश मीडियम स्कूल, सुशिला शंकरराव गाढवे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष शंकरराव गाढवे, उपाध्यक्ष सुरेश पवार, सचिव अनिरूद्ध गाढवे, संचालक वसंतराव पंडित, डॉ. नितीन सावंत, राज्य उत्पादन शुल्क उपनिरीक्षक ज्योती तळेकर आणि सहायक निबंधक भाग्यश्री गोळे, उपप्राचार्य अरुंधती गाढवे, सुशिला मोहिते, डॉ. प्रतिभा पाटणे उपस्थित होत्या.



श्रीपाद जाधव यांचा सन्मान करताना शंकरराव गाढवे, सुरेश पवार, अनिरुद्ध गाढवे, डॉ. नितीन सावंत व इतर.

यावेळी शंकरराव गाढवे यांनी संस्थेच्या उभारणीतील संघर्ष आणि सुशीला गाढवे यांनी दिलेली साथ याविषयी विचार मांडले. तर अनिरुद्ध गाढवे यांनी प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती दिली. दरम्यान, या सोहळ्यात संत सेवा संघाचे संजय गोडबोले यांनी स्त्री शक्ती, आत्मविश्वास आणि क्षमता यांविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी गुणवंत विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती देण्यात आली. वैद्यकीय शिबिरात परिसरातील नागरिकांनी आरोग्य तपासणी करून घेतली. प्रा. प्रवीण बोरगावे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य हणमंत जाधव यांनी आभार मानले.

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली उदयनराजे यांची भेट

सातारा: जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी खासदार उदयनराजे भोसले यांची त्यांच्या जलमंदिर पॅलेस या निवासस्थानी रविवारी सदिच्छा भेट घेतली. यावेळी जिल्ह्यातील प्रश्नांसंदर्भात सविस्तर चर्चा झाली.



सातारा येथील औद्योगिक वसाहतीमध्ये केंद्रीय एमएसएमई मंत्रालयाच्या माध्यमातून टेक्नॉलॉजी सेंटर उभारणे, क्षेत्र माहुली येथे केंद्रीय विद्यालय उभारणे, शहरात आर्चरी, क्लायम्बिंग वॉल व स्केटिंग ग्राउंड उभारणे, दिव्यांग बांधवांसाठी सेन्सरी गार्डन विकसित करणे, सातारा आणि कराड रेल्वे स्टेशनसाठी नियमित बससेवा सुरू करणे, सातारा येथील पशुसंवर्धन विभागाची जागा एमआयडीसीकडे हस्तांतरित करून, त्यामध्ये आयटी पार्क उभारणे, कृष्णा नदीच्या माथा ते पायथा प्रदूषणमुक्तीसाठी ठोस कृती कार्यक्रम आखणे, क्षेत्र माहुली येथे मध्यवर्ती कारागृहासाठी जागा हस्तांतरित करणे, सातारा, जावळी, महाबळेश्वर व पाटण या तालुक्यांमधील ज्या गावांना गावठाण निश्चित झालेले नाही, अशा गावांना गावठाण निश्चिती करणे. कोयना, कण्हेर, धोम व उरमोडी धरण परिसरात सी प्लेन कार्यान्वित करणे, जिल्ह्यातील पर्यटनवाढीसाठी उपाययोजना आणि अन्य काही महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली.

## बावधन बगाड यात्रा उत्साहात पार पाडू

### प्रांताधिकारी राजेंद्र कचरे, पूर्व नियोजन आढावा बैठकीत कर्मचाऱ्यांना सूचना

बावधनः बावधन ता. वाई गावचे ग्रामदैवत श्रीकाळभैरनाथाची प्रसिद्ध बगाड यात्रा येत्या १८ ते २० मार्च या कालावधीत होणार आहे. दि. १८ तारखेला श्री नाथांचा छबीना, १९ तारखेला बगाड आणि २० तारखेला कुस्त्या असे यात्रेचे स्वरूप आहे. यात्रा शांततेत, उत्साहात, सुरक्षित पार पडण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वय साधून आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात. यात्रा कालावधीत कोणताही अनुचित प्रकार होणार नाही यासाठी सर्वांनी दक्ष राहावे, असे निर्देश वाईचे प्रांताधिकारी राजेंद्र कचरे यांनी दिले.

येथील बगाड यात्रेची नियोजित बैठक प्रांताधिकारी कचरे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत बावधन येथे पार पडली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस अरुणादेवी पिसाळ, शशिकांत पिसाळ, मदन भोसले यांच्यासह तहसीलदार सोनाली मेटकरी, पोलीस निरीक्षक जितेंद्र शहाणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता महेश गोंजारी, ग्रामपंचायत विस्तार अधिकारी रुपेश मोरे, पशुधन विकास अधिकारी डॉ. जयसिंग सिसोदिया, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सागर गायकवाड, सार्वजनिक बांधकाम शाखा अभियंता हर्षवर्धन आवळे, वाई आगर व्यवस्थापक युवराज कदम, महावितरण शाखा अभियंता गणेश खोदे, मंडलाधिकारी धनंजय भोसले, महसूल सहाय्यक शिरसाट, कनिष्ठ अभियंता वैभव माडेकर, आरोग्य निरीक्षक विठ्ठल पोळ, ग्रामपंचायत अधिकारी आर व्ही चव्हाण, तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तानाजी कचरे, विवेक भोसले, राजेंद्र कदम, अंकुश कुंभार, विश्वास पिसाळ, भैरवनाथ



देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अजित पिसाळ, भाजप तालुका अध्यक्ष दीपक ननावरे, वहीवाटदार चंद्रकांत भोसले, उपसरपंच उदयसिंह पिसाळ यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

कचरे म्हणाले यात्रा आनंदात पार पडण्याची जबाबदारी ही प्रशासनासोबत, ट्रस्ट, आणि ग्रामस्थ यांची देखील आहे. येणाऱ्या भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. तसेच बगाडासाठी लागणारे बैल यांना कोणतीही इजा होणार नाही याची सर्वांनी जबाबदारी घेणे गरजेचे आहे, यासाठी ठीक ठिकाणी पशुवैद्यकीय अधिकारी उपस्थित असणे गरजेचे आहे.

यात्रेतील येणाऱ्या महिलांची सुरक्षा तसेच वाहनांचे योग्य नियोजन ग्रामस्थांच्या सहकार्याने पोलीस प्रशासनाकडून करण्यात यावे. यात्रेचा मुख्य कालावधी हा तीन दिवसांचा असल्याने गावाला पूर्ण वेळ वीजपुरवठा, तसेच बगाडाच्या दुसऱ्या दिवशी शेतीपंपची वीज पूर्णवेळ चालू राहील याची जबाबदारी संबंधित विभागाने घ्यावी. सार्वजनिक बांधकाम विभागाने बगाड मार्गातील असणारी रस्त्याची डागडुजी लवकरात लवकर करून घेणे, तसेच रस्त्यामध्ये अडचणीत असलेली झाडी कमी करण्यात यावी. आरोग्य विभागाने यात्रेकरूंच्या सेवेसाठी ठीक ठिकाणी सेंटर उभे करावे, मोबाईल टॉयलेट, स्वच्छता, या जबाबदाऱ्या पार पडाव्यात.

## कोणतीही खातरजमा केल्याशिवाय पत्रकारांवर गुन्हा दाखल करू नये...

### खटाव तालुका पत्रकार संघाचे प्रशासनाला निवेदन

वडूज : पत्रकार तुषार खरात यांच्यावर गुन्हा दाखल करताना कोणतीही खातरजमा न करता अटक केली. त्या निषेधार्थ खटाव तालुका पत्रकार संघाच्यावतीने महसूल व पोलिस प्रशासनाला लेखी निवेदन दिले.

यावेळी औंध, मायणी, कातरखटाव व वडूजचे पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी फलटण उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल धस, दहिवडी उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय व तहसीलदार बाई माने यांना संघटनेच्यावतीने लेखी निवेदन देण्यात आले.

मंत्री जयकुमार गोरे यांची यूट्यूब चॅनलचे पत्रकार तुषार खरात यांनी विविध बातम्या प्रसिद्ध करून बदनामी केल्याप्रकरणी हक्कभंग दाखल केला. व्यक्तिगत बदनामीप्रकरणी गुन्हा दाखल करणे क्रमप्राप्त होते. मात्र, कार्यकर्त्यांच्या माध्यमातून ॲट्रासिटी,खंडणी व विविध प्रकारचे



पत्रकार संघाच्यावतीने दहीवडी उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल धस यांना निवेदन देताना तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते.

गुन्हे दाखल करून खरात यांना अटक केली. वास्तविक पाहता पोलिस प्रशासनाने संबंधित गुन्ह्याची खातरजमा करणे आवश्यक होते. विविध गुन्हे दाखल करून व अटक करून पत्रकार खरात हे तुरुंगाच्या बाहेर येऊच शकणार नाहीत, अशीच व्यवस्था केली की काय, अशा चर्चांना सध्या उधाण आले आहे. सूडबुद्धीने एखाद्या पत्रकाराला आयुष्यातून उठविण्याचा प्रयत्न होत असताना हुतात्मा भूमी म्हणून राज्याला परिचीत असणाऱ्या खटाव तालुक्यातील पत्रकार हा अन्याय कदापि सहन करणार नाहीत. यासाठी लोकशाहीच्या मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा खटाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आला आहे.राज्यातील पत्रकारांच्यात शासनाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबांवर दडपशाही पद्धतीने होणाऱ्या अन्यायाविरोधात शासनाने तातडीने दखल घेऊन लोकशाहीतील महत्त्वपूर्ण घटकाला न्याय द्यावा, अशी मागणी पत्रकार संघाच्या वतीने यावेळी केली.

## कराड उत्तरमधील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांसह विविध कामे मार्गी लागणार

### आ. मनोज घोरपडे यांच्या प्रयत्नांना यश

कराड : राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांच्यासमवेत मुंबई येथे म मत्रालयात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत कराड उत्तर मतदारसंघातील रखडलेल्या कोट्यवधींच्या अनेक सिंचनाची कामे मार्गी लावण्याबरोबरच पूरग्रस्त गावांच्या संरक्षण भिंती, पुनर्वसित गावांना सुविधा, कृष्णा नदीवर नवीन बंधारे यासह विविध महत्त्वपूर्ण कामांबाबत चर्चा झाली असून ही कामे झपाट्याने मार्गी लागणार असल्याची माहिती आ. मनोज घोरपडे यांनी दिली.

बैठकीत सचिव संजय बेलसरे, कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हेमंत धुमाळ, मुख्य अभियंता हणमंत गुनाले, कार्यकारी अभियंता राहुल घनवट, कार्यकारी अभियंता रेड्डीयार उपस्थित होते.

आ. मनोज घोरपडे म्हणाले, कराड उत्तरमधील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याची हणबरवाडी– धनगरवाडी उपसा सिंचन योजनेपैकी धनगरवाडी उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक–१ची ची सर्व कामे पूर्ण झाली असून सदरची योजना २० मार्च अखेर कार्यान्वित होत आहे. तसेच धनगरवाडी उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक–१ व २ बाबत कालबद्ध कार्यक्रम तयार असून टप्पा क्रमांक २ ची स्थापत्य विद्युत व यांत्रिकीची सर्व कामे डिसेंबर २५ अखेर पूर्ण करून योजना कार्यान्वित होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

पाल–इंदोली उपसा सिंचन योजनेचा अहवालही शासनास सादर करण्यात आला असून त्याचेही काम लवकरच पूर्ण होण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. सदर योजनेस याच आठवड्यामध्ये मान्यता मिळणार आहे. शामगाव व राजाचे कुर्ले गावास टेंभू योजनेतून पाणी देण्याचे मान्य केले आहे.

पूग्रस्त गावांना संरक्षण भिंतीचा पाठपुरावा

कृष्णा नदीवरील गावांना पूर संरक्षक भिंती बांधण्यात येणार असून यामध्ये कोर्टी, उंब्रज, वराडे, कोणेगाव, कवठे, खराडे, कालगाव, तारगाव, नांदगाव या पूरग्रस्त गावांचा समावेश करण्यात आला आहे.

## संपादकीय

### जिओस्पॅशल तंत्रज्ञानः एक प्रभावी साधन

जिओस्पॅशल तंत्रज्ञान ग्रामपंचायत विकास आराखडा (जीपीडीपी) बनविण्यात अत्यंत प्रभावी ठरू शकते. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीतर्फे अनेक विषयांवरील कार्यशाळा आयोजित केल्या जातात. त्याअंतर्गत ६ मार्च रोजी मुंबईत 'स्पेस-टेक फॉर गुड गव्हर्नन्स' ही राष्ट्रीय परिषद पार पडली, त्यानिमित्त... सुशासन आणि ग्रामविकास हे कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे घटक आहेत. आधुनिक युगात तंत्रज्ञान प्रत्येक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जिओस्पॅशल तंत्रज्ञानातून आपल्याला अवकाश, भू-स्थानिक आणि भौगोलिक स्थितीची परिपूर्ण माहिती व विश्लेषण उपलब्ध होते, ज्याचा प्रशासन आणि विकासकामांमध्ये उत्तम उपयोग होऊ शकतो. सुशासन म्हणजे पारदर्शक, उत्तरदायी आणि लोकहिताचे प्रशासन नियोजन, धोरणे ठरविणे आणि योजनांची प्रभावी, जलद व अचूक अंमलबजावणी करण्यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. जीपीएस, रिमोट सेन्सिंग आणि जीआयएस यांसारख्या प्रणालीच्या मदतीने गावांची अचूक माहिती मिळते, जी हे आव्हान पेलण्यात उपयुक्त ठरते. जुन्या पध्दतींवर अवलंबून राहिल्यामुळे अनेकदा अयोग्य योजना तयार होतात आणि नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन चुकते. जिओस्पॅशल तंत्रज्ञान ग्रामपंचायत विकास आराखडा (जीपीडीपी) बनविण्यात अत्यंत प्रभावी ठरू शकते. गावाच्या नैसर्गिक संसाधनांचे अचूक विश्लेषण करण्यासाठी त्यांची माहिती असणे आवश्यक असते. ही माहिती आज उपग्रहांद्वारे विविध माध्यमांवर उपलब्ध आहे. त्याआधारे निर्णय घेतल्यास योग्य योजना आखता येतात. जलसंधारण, मृदा संरक्षण, सामाजिक वनीकरण आणि नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनासाठी या माहितीचा उपयोग होतो. ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी आणि स्थानिक प्रशासनाला वैज्ञानिक पध्दतींनी नियोजन करण्याची संधी मिळते. तसेच निधी वितरण, योजनांची अंमलबजावणी आणि विकासकामांचा मागोवा घेणे सुलभ होते. गावाचा विकास हा पाणी, शेती आणि शासन यांवर अवलंबून असतो.

अनेक गावांमध्ये पाणीप्रश्न गंभीर आहे. काही वेळा पुरेसा जलसाठा उपलब्ध असूनही व्यवस्थापनाच्या अभावामुळे पाणीटंचाई असते. पावसामुळे जे पाणी मिळते ते बऱ्याच वेळा वाहून जाते. इस्रोने विकसित केलेल्या अनेक संकेतस्थळांवर गावातील जलस्त्रोतांची माहिती उपलब्ध असते किंवा नसल्यास ती उपलब्ध करता येते. या माहितीच्या आधारे जलव्यवस्थापन आणि संवर्धन करता येते. उदाहरणार्थ, इस्रोच्या भुवन या संकेतस्थळावर मिळणाऱ्या माहितीआधारे जलस्त्रोत शोधणे व भू-जलस्तर निरीक्षण करता येते. ग्रामविकासासाठी जलव्यवस्थापनेनंतर शेती व्यवस्थापन येते. जमिनीचा प्रकार, मृदा आरोग्य विश्लेषण व पीक पध्दती ठरविण्यात या तंत्रज्ञानाचा वापर उपयोग पडतो. पर्यावरण संवर्धनासाठी गावातील मोकळ्या जमिनीवर हवामान आधारित वृक्षारोपण, वनसंवर्धन आणि वनधोरणात पारदर्शकता अशा गोष्टींचे योग्य नियोजन करता येते. गावाच्या विकासासाठी गरजेच्या असणाऱ्या पायाभूत सुविधा आणि त्यांचे नियोजन करण्यासाठी ग्राम मानचित्र संकेतस्थळावरच्या माहितीचा वापर करता येतो. गुगल अर्थ प्रोद्वारे थेट उपग्रह प्रतिमा वापरून योजना तयार करता येतात. भू-नकाशे जमिनीच्या डिजिटल नोंदीसाठी उपयुक्त ठरतात. पीएम-किसान संकेतस्थळ शेतकऱ्यांसाठी अचूक आणि वेळेवर निधीवाटपासाठी उपयुक्त ठरते. नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन करणे हे एक मोठे आव्हान असते. भुवन संकेतस्थळावरील माहिती वापरून आपत्तीपूर्व अंदाजही वर्तवता येतो आणि व्यवस्थापन करणे सोपे जाते. पूर, दुष्काळ आणि हवामान परिस्थितीचे निरीक्षण करता येते. या माहितीस्त्रोतांचा उपयोग करण्यात आव्हाने तर आहेतच, जसे की तांत्रिक ज्ञानाचा अभाव, भू-सांख्यिकी माहिती व संसाधनांची कमतरता आणि स्थानिक भाषेत माहिती उपलब्ध नसणे, पण प्रशिक्षण शिबिरांतून मोफत व सार्वजनिक माहितीस्त्रोतांचा वापर आणि भ्रमणध्वनी आधारित जीआयएस ॲप्सचा वापर करायला शिकणे आणि स्थानिक भाषेत संकेतस्थळे विकसित करणे अशा उपाययोजना करून हे अडथळे दूर करता येतील.

# मंजूर निधी मार्च अखेर खर्च करा : याशनी नागराजन

सातारा : शासनाकडून विविध विभागांना मिळणारा निधी मार्चअखेर खर्च करण्याचे नियोजन सर्व विभागप्रमुखांनी करावे. मंजूर निधी मुदतीत खर्च न झाल्यास खातेप्रमुखांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असा इशारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी दिला.



यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेच्या ठराव समितीची सभा कराड येथील टाऊन हॉलमध्ये झाली.

याशनी नागराजन सभेच्या अध्यक्षस्थानी होत्या. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश घुले, अर्चना वाघमळे, रोहिणी ढवळे, प्रज्ञा माने, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. विनोद पवार, कार्यकारी अभियंता अमर नलवडे, संजय लाड, कृषी विकास अधिकारी गजानन ननावरे, शिक्षणाधिकारी शबनम मुजावर, समाजकल्याण अधिकारी विद्यानंद चलवादी उपस्थित होते.

सभेत विषयपत्रिकेवरील सहा आणि ऐनवेळाच्या विषयांना एकमताने मंजुरी देण्यात आली. अनेक विकासकामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून, ही कामे लवकरात लवकर सुरू करावीत.

३१ मार्चपर्यंत जास्तीत जास्त निधी खर्च होण्यासाठी प्रयत्न करावेत. विविध योजनांवर आलेला निधी वेळेत खर्च करण्यासाठी सर्व विभागांनी नियोजन करावे. शंभर दिवसांच्या आराखड्यातील कामे मुदतीत पूर्ण होण्याकडे विभागप्रमुखांनी लक्ष केंद्रित करावे, अशा सूचना नागराजन यांनी दिल्या. नीलेश घुले यांनी विषयपत्रिकेवरील विषयांचे वाचन केले.

# मुख्याधिकाऱ्यांची बदनामी थांबवा, अन्यथा जनआंदोलन

सातारा : सातारा पालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी अभिजित बापट यांच्यावर जाणीवपूर्वक आरोप करून बदनामी करण्याचा प्रयत्न काहीजण करीत आहेत. संबंधितांनी हा खटाटोप थांबवावा, अन्यथा जन आंदोलन उभारू, असा इशारा समस्त सातारकरांच्या वतीने देण्यात आला आहे.



याबाबत जिल्हाधिकारी संतोष पाटील यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, खासदार उदयनराजे भोसले, तसेच सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा शहरात अनेक विकासकामे केली जात आहेत. या विकासात मुख्याधिकारी, तसेच अन्य अधिकारी व कर्मचारी यांचाही हातभार लागला आहे. असे असताना काहीजण जाणीवपूर्वक मुख्याधिकाऱ्यांची बदनामी करण्याच्या करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या घटनेचा संघटना निषेध व्यक्त करत आहे, असा आरोप करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अन्यथा जनआंदोलन उभारले जाईल.

निवेदनावर अशोक भोसले, किरण कांबळे, महादेव महापुरे, अक्षय सोनावणे, सागर रोकडे, सागर वायदंडे, अमृत भंडारी आदींच्या सह्या आहेत.

# सातारा पंचायत समितीने राबवला प्रज्ञाशोध परीक्षेचा अभिनव उपक्रम

सातारा : विद्यार्थी गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत सातारा पंचायत समिती शिक्षण विभागाने इयत्ता तिसरी व सहावी प्रज्ञाशोध परीक्षा रविवारी घेतली. या अभिनव आणि नावीन्यपूर्ण उपक्रमाचे ग्रामस्थ, पालक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीसह सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, जिल्हा शिक्षणाधिकारी शबनम मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि गटविकास अधिकारी सतीश बुद्धे व उपशिक्षणाधिकारी रवींद्र खंदारे यांच्या संकल्पनेतून पंचायत समितीतर्फे इयत्ता तिसरी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांची प्रज्ञाशोध परीक्षा झाली. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचा सराव व्हावा, पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षांची तयारी व्हावी या उद्देशाने पंचायत समितीच्या स्वनिधीतून परीक्षा घेतली. भाषा, गणित, बुद्धिमत्ता, इंग्रजी, समाजशास्त्र, सामान्य विज्ञान विषय या परीक्षेला होते. इयत्ता तिसरीची परीक्षा २२ केंद्रावर होऊन २,१७२ विद्यार्थ्यांनी, तर इयत्ता सहावीची परीक्षा ११ केंद्रावर होऊन ८९४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे ज्या पद्धतीने आयोजन केले जाते अगदी तशाच पद्धतीने तालुकास्तरीय इयत्ता तिसरी व इयत्ता सहावी प्रज्ञाशोध परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवारी सर्व केंद्र संचालकांची मिटींग, शनिवारी पर्यवेक्षक मिटींग, तसेच बैठक व्यवस्थेचे काटेकोर नियोजन करून ठिकठिकाणच्या केंद्रावर परीक्षा उत्साहात संपन्न झाली.प्रज्ञाशोध परीक्षेमुळे विद्यार्थी गुणवत्ता, स्पर्धा परीक्षा सराव व महत्व या गोष्टी गुणवत्ता वाढीसाठी फायदेशीर ठरणार असुन राबविलेल्या अभिनव उपक्रमाचे शिक्षक, ग्रामस्थ, पालकवर्गातून स्वागत होत आहे.

# शिक्षक बँकेच्या कर्जाचे व्याजदर कमी करा ; सभासदांची निवेदनाव्दारे मागणी

पळशी : प्राथमिक शिक्षक बँकेने नुकताच शताब्दी महोत्सव साजरा केला पण सभासदांच्या पदरी काहीही पडले नाही. संस्थेचे कर्जवाटप बरेचसे कमी झाले आहे, त्यामुळे संस्थेच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. तरी दीर्घमुदत कर्जाचे व्याजदर एक टक्क्याने कमी करण्यात यावा किंवा दीर्घमुदत दोन हा नवीन कर्जप्रकार सुरू करून त्याचा व्याजदर १० टक्के ठेवावा व कर्जमर्यादा २५ लाख करावी अशी मागणी निवेदनाव्दारे माजी व्हा. चेअरमन महेंद्र अवघडे आणि सहकाऱ्यांनी संचालक मंडळ आणि बँक व्यवस्थापनाकडे केली आहे.निवेदनात, दीर्घमुदत कर्जाचे व्याजदर एक अंकी होण्याची सभासद वाट पाहत आहेत. डी. सी.पी.एस.धारक मयत सभासदांचे कर्ज संपूर्ण माफ करावे अशी ही मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन शिक्षक बँकेच्या चेअरमन निशा मुळीक, व्हा. चेअरमन सुरेश पवार, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद कणसे यांना देण्यात आले.

निवेदनावर माजी व्हा. चेअरमन महेंद्र अवघडे, संचालक विजय शिर्के, माजी संचालक बंडोबा शिंदे, खंडाळा तालुकाध्यक्ष नवनाथ क्षीरसागर, कोरेगाव अध्यक्ष अरुण घोरपडे, बळीराम वीरकर, संजय खरात, राजेंद्र खरात यांच्या सहया आहेत.

'सह्याद्री वेध' हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक बोतालजी गणेश रामदास यांनी सरस्वती ऑफसेट, २७५/क, मंगळवार पेठ, सातारा ४१५००२ (महाराष्ट्र) येथे छापून सह्याद्री वेध कार्यालय, जुनी पेठ,कोरेगाव,जि.सातारा ४१५५०१ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. ● संपादक - बोतालजी गणेश रामदास मो. ९९७०८७६६६९ , ईमेल - sahyadrivedh@gmail.com (सर्व वाद विवाद कोरेगांव न्यायालयीन कक्षेत)

' SAHYADRI VEDH' Printer, Publisher and Owner by Botalji Ganesh Ramdas Printed at Saraswati Offset, 275/K, Mangalwar Peth, Satara 415002 (M.S.) and Published at Sahyadri Vedh Karyalaya, Junipeth, Koregaon, Dist- Satara- 415501 (M.S.) ● Editor- Botalji Ganesh Ramdas Mo.- 9970876669 Email - sahyadrivedh@gmail.com

# प्राथमिक शिक्षक बँकेच्या चेअरमनपदी प्रथमच महिलेला संधी

फलटण : प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., साताराच्या चेअरमनपदी १०० वर्षांच्या इतिहासात प्रथमच महिलेला चेअरमन पदावर काम करण्याची संधी सौ. निशा मुळीक यांच्या रूपाने मिळाली. हा फलटण तालुक्याचा व समस्त सातारा जिल्ह्यातील महिला भगिनींचा गौरव असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय प्रा. शिक्षक संघाचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष बलवंत पाटील यांनी केले.

प्रा. शिक्षक सहकारी बँक लि., सातारा, शाखा फलटणच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त येथील अनंत मंगल कार्यालयात आयोजित महिला सन्मान व स्नेहमेळाव्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बँकेच्या चेअरमन सौ. निशा मुळीक होत्या. यावेळी जिल्हा अधीक्षक, कृषी सौ. भाग्यश्री फरांदे, जोशी हॉस्पिटल प्रा. लि., फलटणच्या डॉ. सौ. प्राची जोशी, महात्मा शिक्षण संस्थेच्या सचिव सौ. वैशाली चोरमले, फलटण शहर पोलीस ठाणे, प्रभारी पोलीस निरीक्षक हेमंतकुमार शहा, पोलीस उपनिरीक्षक अयोध्या घोरपडे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, सोलापूर कोमल डांगे, वनपाल राहुल निकम प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



यावेळी डॉ. प्राची जोशी यांनी उपस्थित महिलांना उत्तम आरोग्यासाठी मार्गदर्शन केले. जिल्हा अधीक्षक, कृषी सौ. भाग्यश्री फरांदे यांनी बदलत्या जीवन शैलीमुळे कुटुंब, गाव, शहर यावर झालेला परिणाम व महिलांसाठी योग्य उपाययोजना यावर प्रबोधन केले.

यावेळी जिल्हा अधीक्षक, कृषी भाग्यश्री फरांदे, डॉ. सौ. प्राची जोशी, मोटार वाहन परिवहन विभाग सहाय्यक वाहतूक निरीक्षक कोमल डांगे, पहिल्या महिला चेअरमन निशा मुळीक, पोलीस उपनिरीक्षक अयोध्या घोरपडे, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या सौ. भारती धुमाळ, बालभारती एस.सी. आर. टी. मध्ये सहभाग असणाऱ्या माधुरी सोनवलकर यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी माजी चेअरमन व विद्यमान संचालक राजेंद्र बोराटे, माजी व्हा. चेअरमन व विद्यमान संचालक शशिकांत सोनवलकर, संचालक, सभासद, जिल्हा सरचिटणीस सुभाष ढालपे, महिला आघाडी तालुकाध्यक्षा भारती धुमाळ, शिक्षक संघाचे तालकाध्यक्ष धनंजय सोनवलकर आदी उपस्थित होते.

# सुलतानवाडीच्या विकासामध्ये कमी पडणार नाही

## डॉ. प्रिया महेश शिंदे, ६० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचा प्रारंभ

कोरेगाव : सुलतानवाडी गावाने नेहमीच आ. महेश शिंदे यांना पाठबळ दिले आहे. विधानसभेच्या दोन्ही निवडणुकीत या गावाने विकासाच्या बाजूने मतदान करून आपले योगदान दिले आहे. सुलतानवाडीचे विकासामध्ये कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही डॉ. प्रियाताई महेश शिंदे यांनी दिली.

सुलतानवाडी येथे आमदार महेश शिंदे यांच्या माध्यमातून नव्याने करण्यात येणाऱ्या ६० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आणि झालेल्या विकास कामांचे लोकार्पण डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी बोलत होत्या. यावेळी युवा नेते



ग्रामपंचायत सदस्य राहुल बर्गे, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक ज्योतिराम बर्गे, सरपंच शहाजी फडतरे, उपसरपंच प्रदीप जाधव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

प्रभाग क्रमांक तीनमधील दहा लाख रुपये खर्चुन तयार करण्यात आलेल्या रस्ता आणि माऊलाई ओढ्यावरील बंधाऱ्याचे भूमिपूजन करण्यात आले.

प्रारंभी ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्यावतीने डॉ. प्रियाताई शिंदे यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास मनिषा बर्गे, ग्रामपंचायत सदस्य योगेश कळसे, प्रसाद फडतरे, बाळू औंधकर, लिंबाजी सावंत, विश्वजीत फडतरे, नामदेव फडतरे, मोहन बर्गे, अशोक फडतरे, अंकुश फडतरे, दिगंबर फडतरे, जयंत फडतरे, जगन्नाथ फडतरे, आशिष बर्गे, सूर्यकांत बर्गे, राजेंद्र बर्गे, निखिल जाधव, प्रशांत फडतरे, आदर्श जाधव यांच्यासह ग्रामस्थ पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत रामकृष्ण वेताळ संघ प्रथम

ओगलेवाडी : सातारा येथील नेहरू युवा केंद्र यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये कराड तालुक्यातील रामकृष्ण वेताळ यूथ फाउंडेशन कबड्डी संघाने प्रथम क्रमांक मिळवला. या संघास वेतन पथक अधीक्षक सुनील शिखरे व निवृत्त पोलीस निरीक्षक राजेंद्र यादव यांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

नेहरू युवा केंद्राच्यावतीने या जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये कबड्डी, खो-खो, गोळा फेक व १०० मीटर धावणे आदी क्रीडा प्रकारांचा समावेश होता. या स्पर्धेमध्ये कराड, खटाव, सातारा व



खंडाळा या तालुक्यातील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. सर्व स्पर्धेमध्ये मिळून ५० पेक्षा जास्त संघांनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीने सर्व स्पर्धा पार पडल्या.

अटीतटीने पार पडलेल्या कबड्डीच्या सामन्यांमध्ये रामकृष्ण वेताळ कबड्डी संघाने प्रथम क्रमांक मिळवला. या संघामध्ये संघनायक शुभम् काळे, शुभम पवार, वेदांत क्षीरसागर, तेजस सातपुते, रवी नाटेकर, गणेश खंडागळे, संकेत पवार, ओम भोसले, सत्यजित सावंत या खेळाडूंचा सहभाग होता. या खेळाडूंना आकाश देसाई यांनी मार्गदर्शन केले. आकाश देसाई यांच्या उत्तम मार्गदर्शनामुळे रामकृष्ण वेताळ कबड्डी संघ या स्पर्धेमध्ये अव्वल ठरला आहे.या विजेत्या संघाला सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. या विजयी संघाची निवड पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. नेहरू युवा मंडळाच्या जिल्हास्तरीय स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील युवकांना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली, याचबरोबर ग्रामीण भागात असणारे क्रीडा कौशल्य समाजासमोर येण्यास मदत झाली आहे.

# राष्ट्रीय सेवा योजना परिवर्तनाचे माध्यम : डॉ. संगमेश कोडे

## रहिमतपूर कॉलेजच्या शिबिराचे अंभेरी येथे उद्घाटन

रहिमतपूर : भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. ही तरुणाई म्हणजे देशाची, समाजाची खरी संपत्ती, शक्ती असते. ही शक्ती राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून एकत्रित येते तेव्हा एकाचवेळी शेकडो हात कामाला लागतात. गावागावात वैविध्यपूर्ण विकासकामे होतात. ख-या अर्थाने राष्ट्रीय सेवा योजना हे सामाजिक परिवर्तनाचे माध्यम असते, असे प्रतिपादन कोरेगावचे तहसिलदार डॉ. संगमेश कोडे यांनी केले.




रहिमतपूर येथील सरदार बाबासाहेब माने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे अंभेरी (खालची) ता. कोरेगाव येथे आयोजित केले आहे. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा आघाडीच्या उपाध्यक्षा, पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सौ. चित्रलेखा माने-कदम या होत्या.

यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. भाग्यश्री जाधव, माजी सरपंच विष्णू गायकवाड, माजी उपसरपंच सुहास निकम, शालेय समिती अध्यक्ष उत्तम निकम, कोरेगाव पंचायत समितीच्या माजी सभापती सौ. कमल निकम, माजी प्राचार्य भरत निकम, सोसायटीचे माजी चेअरमन नानासो निकम, पांडुरंग माने, श्रीरंग निकम, मुख्याध्यापक शंकर निकम, प्रगतशील शेतकरी तुकाराम निकम, जयकुमार निकम, ग्रामपंचायत माजी सदस्या सौ सुवर्णा गायकवाड, कै.आनंदराव निकम फाउंडेशनचे अध्यक्ष समाधान गायकवाड, युवानेते अथर्व निकम, युवा उद्योजक लहुराज निकम, एन एस एस कार्यक्रमाधिकारी प्रा. शिवाजी चव्हाण, प्रा. डॉ. सुनंदा मोहिते यासह विविध मान्यवर उपस्थित होते

सौ. चित्रलेखा माने कदम म्हणाल्या की, शासनाच्या निर्मलग्राम योजनेत रहिमतपूर परिसरातील अनेक गावे सहभागी झाली होती. त्यावेळी आमच्या महाविद्यालयातीलएनएस एस विभागाने दिलेले योगदान खूप मोठे होते.

या शिबिरामुळेच परिसरातील कित्येक गावे निर्मलग्राम पुरस्काराची मानकरी ठरली आहेत. प्राचार्या डॉ. भाग्यश्री जाधव यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. युवराज खरात यांनी करून दिला.

प्रा. डॉ. सुनंदा मोहिते यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. शिवराज गायकवाड यांनी आभार मानले.

# प्राथमिक शाळा ऊर्जेचा स्रोत: प्रांताधिकारी गाडेकर

## पळशी प्राथमिक शाळेला भेट; विद्यार्थ्यांशी साधला संवाद

औंध : जीवनाचा पाया प्राथमिक शाळेत रचला जातो. सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली पाहिजेत. प्राथमिक शाळेला भौतिक सोईसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांच्या जीवनात यशाचा मार्ग दाखविणारी प्राथमिक शाळा उर्जेचा स्त्रोत आहे, असे प्रतिपादन माण-खटावच्या प्रांताधिकारी उज्वला गाडेकर यांनी व्यक्त केले.

पळशी (ता. खटाव) येथे जिल्हा



परिषद शाळा पळशी येथे भेटी देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्यात असणाऱ्या कलागुणांना वाव मिळाला पाहिजे. त्यांच्यातील इंग्रजी संभाषण कौशल्य विकसित होण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी केले. फॉर्मर आयडी संदर्भात शिवांश ऑनलाईन व जोतिर्लिंग ई-सेवा केंद्रास भेट देऊन त्यांनी आढावा घेतला.

यावेळी सरपंच रेश्मा राऊत, उपसरपंच संतोष कुकले, वरिष्ठ मुख्याध्यापिका द्रौपदी जाधव, घोरपडे (सर्कल) तलाठी आर बी खाडे, पोलिस पाटील सागर जाधव, सुधीर जाधव, पंकज पवार, सुधीर जाधव, प्रकाश देशमुख, विलास पवार, सचिन पवार, अशोक पवार, संजय निंबाळकर, कृष्णत राऊत सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर आशा सेविकांचे आंदोलन मागे

पाटण : पाटण तालुक्यातील हेळवाक प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशा सेविकांनी समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून महिला दिनी काम बंद आंदोलन केले होते. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एन. टी. कांबळे यांनी आशा सेविकांशी संवाद साधत बैठकीचे आश्वासन दिल्याने आशा सेविकांकडून आंदोलन मागे घेण्यात आले.

सविस्तर माहिती घेऊन पुढील आठवड्यात हेळवाक आरोग्य केंद्रात बैठक घेवून यावर मार्ग काढण्यात येईल, असे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एन.



टी. कांबळे यांनी सांगितले.

याबाबत आंदोलन स्थळावरील आशा सेविकांनी दिलेल्या माहितीनुसार, मणेरी व गोकुळ या उपकेंद्रातील समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील आशा सेविकांनी गेली अनेक महिने

विविध कारणांनी त्रास देत आशा सेविकांच्या कामाचा अहवाल व प्रोत्साहन भत्यावर सहीस टाळाटाळ करणे, गाव भेट, सर्व्हे व इतर कामासाठी आशांना जबाबदार धरणे आदी बाबीस कंटाळून हेळवाक प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशा सेविकांनी शनिवार, दि. ८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधत तिमाही बैठकीनंतर हेळवाक आरोग्य केंद्रासमोरच झालेल्या अन्याया विरोधात काम बंद आंदोलन केले होते. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले. आशा सेविकांच्या महिला दिनी झालेल्या आंदोलनाची कोयना भागात जोरदार चर्चा झाली.

# प्रियांका आंबेकर फलटणच्या प्रांताधिकारी



फलटण : फलटण उपविभागाच्या प्रांताधिकारीपदी माढा येथे कार्यरत असणाऱ्या प्रियांका आंबेकर यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्या नियुक्तीचा आदेश सोमवारी आला. फलटण उपविभागाचे प्रांताधिकारी सचिन ढोले यांची महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती झाल्यानंतर फलटणचा कार्यभार हा पर्यवेक्षित उपविभागीय अधिकारी विकास व्यवहारे यांच्याकडे सुपूर्त केला होता.

त्यानंतर नियमित उपविभागीय अधिकारी अर्थात प्रांताधिकारी म्हणून माढा येथे असणाऱ्या प्रियांका आंबेकर यांची नियुक्ती झाली आहे. त्या मंगळवार दि. ११ मार्च रोजी पदभार स्वीकारणार आहेत. त्यांनी यापूर्वी दर्यापूर, जि. अमरावती येथे प्रांताधिकारी म्हणून काम केले आहे.

# माण तालुका ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या निवडी बिनविरोध

## सचिवपदी बापूराव काळेल; मानद अध्यक्षपदी तानाजी गंबरे, उपाध्यक्षपदी हर्षद शिंदे

गोंदवले: महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन संघटनेच्या माण तालुका पदाधिकाऱ्यांचे बिनविरोध निवडी माण पंचायत समितीमध्ये आयोजित बैठकीत संपन्न झाल्या.



सदर बैठक निरिक्षण म्हणून चांद काझी (कायदे सल्लागार), सहनिरीक्षक म्हणून ज्ञानेश्वर बोराटे (खटाव तालुकाध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली व माण तालुकाध्यक्ष संतोष कुमार माळवे यांच्या अध्यक्षतेखाली व मानद अध्यक्ष रामचंद्र गौड, ज्येष्ठ नेते शिवाजीराव लाटे, फलटण तालुकाध्यक्ष गणेश दडस, बाबा बोराटे, सचिन माने (सचिव खटाव तालुका), सहसचिव धनाजी बोडरे यांच्या उपस्थितीत बिनविरोध निवडी पार पडल्या.या निवडीत माण तालुका सचिव पदी बापूराव काळेल, मानद अध्यक्ष तानाजी गबरे, संघटक विक्रम गोरे, उपाध्यक्ष हर्षद शिंदे, कायदेशीर सल्लागार सचिन सकट, प्रसिद्धीप्रमुख सचिन खाडे, सदस्य लक्ष्मण वाघमोडे, मंगेश ढोबळे, कु. शिवानी राऊत यांची निवड करण्यात आल्या.नूतन पदाधिकाऱ्यांचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, जिल्हा बँकेचे संचालक शेखरभाऊ गोरे, सिद्धनाथ पतसंस्थेचे चेअरमन अरुणआबा गोरे, शिवाजीराव शिंदे, गटविकास अधिकारी प्रदीप शेंडगे, सहाय्यक गटविकास अधिकारी चंद्रकांत खाडे, विस्तार अधिकारी मासाळ, बनसोडे, फडतरे, जिल्हाध्यक्ष अभिजीत चव्हाण, सरचिटणीस संदीप सावंत, सर्व जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी यांनी अभिनंदन केले. सूत्रसंचालन सचिन खाडे यांनी केले.

# विनापरवाना होर्डींग्ज लावणाऱ्यांवर गुन्हा दाखल करणार : संदीप घार्गे

दहिवडी : दहिवडी शहरातील रस्त्यावर दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र फ्लेक्स किंवा अन्य बोर्ड लावल्यास सातपट दंड आकारण्यात येणार आहे. तसेच नियम न पाळणाऱ्यांवर व विनापरवाना होर्डींग लावणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी संदीप घार्गे यांनी दिली.दहिवडी नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी संदीप घार्गे यांच्या दालनामध्ये पोलिस उपनिरीक्षक यशवंत जमादार, नगराध्यक्ष सागर पोळ, आरोग्य सभापती महेश जाधव, सुरेंद्र मोरे, तसेच विभाग प्रमुख विजय पाटील व लिपीक निलेश सपकाळ यांच्यासह दहिवडी नगरपंचायत हद्दीतील सर्व ग्राफिक्स दुकानदार, तसेच फ्लेक्स, होर्डींग्ज उभारणाऱ्या व्यवसायिकांची बैठक पार पडली.

या बैठकीत उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या आदेशाबाबत सर्वांना माहिती देण्यात आली. तसेच शासनाच्या फ्लेक्स, होर्डींग्जबाबत देण्यात आलेल्या कायदेशीर सूचनांची विस्तृत माहिती दिली. तसेच दहिवडी सर्वसाधारण सभेत नगरपंचायतीकडून अनधिकृत फ्लेक्स, होर्डींग्जवर ७ पट दंड आकारणीबाबत ठराव झाल्याची माहिती देण्यात आली. दहिवडी शहरातील रस्त्यापासून सुरक्षित अंतर ठेऊनच वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होणार नाही अशा पद्धतीने फ्लेक्स, होर्डींग उभारण्याबाबत उपस्थितांना सूचना देण्यात आल्या. तसेच दिलेल्या जागेत फ्लेक्स न लावल्यास कायदेशीर गुन्हा नोंद केला जाणार असल्याची माहिती मुख्याधिकारी संदीप घार्गे यांनी दिली.

# वाई नगरपरिषदेमध्ये महिला दिन उत्साहात साजरा

## मुख्याधिकारी संजीवनी दळवी यांचा विशेष सन्मान !

वाई, : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वाई नगरपरिषदेमध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व महिलांचा सन्मान रोपं वाटप करून करण्यात आला. यामध्ये विशेष सन्मान वाई नगर परिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक संजीवनी दळवी यांचा करण्यात आला.



कार्यक्रमामध्ये वाई नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक संजीवनी दळवी यांनी महिलांना मार्गदर्शन केले. नगरपरिषदेमधील सर्व कर्मचाऱ्यांना महिला दिनाच्या निमित्ताने विनोद कदम यांनी आर्थिक नियोजन कसे असावे या विषयावर मार्गदर्शन केले.भोपळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यालयीन अधीक्षक हर्षवर्धन मोहिते व नवीन कांबळे यांनी केले.कार्यक्रमासाठी कर निरीक्षक बाळासाहेब कांबळे, पाणीपुरवठा इंजिनियर शीतल जाधव व अनुराधा यादव, सहाय्यक नगर रचनाकार सर्वेश खाडे, सभा अधीक्षक किरण ताटे, विद्युत अभियंता महेश सावळकर, संगणक अभियंता राहुल शेंडगे इत्यादी अधिकारी व नगरपरिषदेचे सर्व कर्मचारी होते. पर्यवेक्षक मनोज बारटक्के यांनी आभार मानले.

# थकबाकीदारांची नावे फलकावर

## मुख्याधिकाऱ्यांकडून नोटिसा : वसुली मोहिमेला वेग

लोणंद : लोणंद नगरपंचायतीची कर वसुली मोहीम जोमात सुरू आहे. थकीत करांचा भरणा करण्यासाठी नगरपंचायतीकडून दवंडी पिटवली जात आहे. याकडे दुर्लक्ष होत असल्याने मुख्याधिकाऱ्यांनी मिळकत थकबाकी असणाऱ्या नागरिकांची नावे फलकावर झळकवण्याचा इशारा दिला आहे. त्याबाबतच्या नोटीसा मुख्याधिकारी दत्तात्रय गायकवाड यांनी मिळकतधारकांना धाडल्या आहेत. थकीत करांचा भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



मार्चअखेर जवळ येवू लागल्याने लोणंद नगरपंचायत प्रशासन चपाच वसुली पथकांच्या माध्यमातून घरपट्टी,थकीत कर ठेवणाऱ्या नागरिकांचे लोणंदमध्ये नळ कनेक्शन तोडण्यात येत आहे.पाणीपट्टी, गाळा भाडे वसुलीसाठी वसुली मोहीम राबवली जात आहे. तरीही थकबाकीदार या आवाहनाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहेत. पुरेशा प्रमाणात कर वसुली न झाल्यामुळे शहराच्या विकासाला अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे नगरपंचायत प्रशासनास नाईलाजाने कारवाईची दंडुका उगारावा लागत आहे.

याच पार्श्वभूमीवर अनेक नागरिकांचे पाणी कनेक्शन तोडण्यात आले आहे. ज्या थकबाकीदारांची पाणी कनेक्शन बंद केली आहेत त्यांनी थकबाकी भरल्याशिवाय परस्पर पाणी कनेक्शन जोडून घेऊ नयेत. पाणी कनेक्शन परस्पर जोडून घेतल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातील,असा इशारा देण्यात आला आहे.

लोणंद नगरपंचायत प्रशासनाकडून थकबाकीदार मालमत्ता धारकांना जप्तीची नोटीस बजावण्याचे काम सुरु आहे. नोटीस मिळाल्यानंतर काही थकबाकीदारांनी पूर्ण थकीत रक्कमेचा भरणा केला आहे.

काहीनी थकीत रकमेपैकी काही रक्कम भरल्यामुळे जप्तीची कारवाई तात्पुरती स्थगित केली आहे. मात्र, या थकबाकीदारांवर कारवाईची टांगती तलवार संपूर्ण करवसुली होईपर्यंत राहणार आहे. वारंवार थकीत कराची मागणी करूनही वेळेवर कर भरणाऱ्या मिळकतधारकांचे फलक शहरातील चौकात लावण्यात येणार आहेत.

# आनंदराव चव्हाण पतसंस्थेच्या वतीने महिलांचा अनोखा सन्मान

ढेबेवाडी : सभासद, ठेवीदार, हितचिंतक व विशेषतः महिलांना आर्थिक स्थैर्य मिळावे या संकल्पनेतून आनंदराव चव्हाण नागरी सह. पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी महिला दिनानिमित्त संस्थेत ठेवीच्या व्याज दरात वाढ केली आहे. तीन महिने मुदतीसाठी म्हणजे ५ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत संस्थेत महिलांनी ठेवलेल्या ठेवीला १०.५० टक्के व्याजदर देण्याचे जाहीर करण्यात आले आहे.



आपल्या पारदर्शक कारभाराने सभासद व ठेवीदारांमध्ये मिळविलेल्या विश्वासार्हतेच्या बळावर या पतसंस्थेने गरुड भरारी घेतली आहे. यंदा संस्था १०० कोटीचा टप्पा पार करेल असा विश्वास चेअरमन अभिजित पाटील यांना आहे. यंदा महिला दिनानिमित्त महिलांना खास भेट म्हणून ठेवीवर वाढीव दरवाढ देऊन महिलांचा सन्मान करण्याचा प्रयत्न केला आहे, असे अभिजित पाटील यांनी सांगितले.

स्थापनेपासून संस्थेने नवनवीन उपक्रम राबवित ठेवीदार व सभासदांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. ग्रामीण विभागासह शहरीभागातही संस्थेचे जाळे निर्माण करण्यात संस्थेने यश मिळविले आहे. संस्थेचे कोअर बँकिंग पध्दतीने सर्व कामकाज सुरु असल्याने सभासद व ठेवीदारांना विनाविलंब सेवा पुरविण्यात येत असते. संस्थेच्या संचालक मंडळाने महिला दिनानिमित्त महिलांचा एक प्रकारे सन्मान केल्याचे संस्थेचे व्यवस्थापक सुहासचंद्र पाटील यांनी सांगितले. यावेळी कार्यालय प्रमुख आनंदकुमार कांबळे, शाखाधिकारी रुपेशकुमार भोई, रवींद्र माने, तुकाराम पाटील, सुरेश ढेब, मेघराज धस तसेच कर्मचारी उपस्थित होते.

# राखीव वनक्षेत्रात वणवा लावल्याप्रकरणी एकावर कारवाई

पाटण : पाटण वन परिक्षेत्रातील झाकडे येथे राखीव वन क्षेत्रात वणवा लावल्याप्रकरणी नितीन साळुंखे याच्यावर वन अधिनियम १९२७ नुसार कारवाई करण्यात आली. त्याला ताब्यातही घेण्यात आले आहे. याबाबत वनविभागाकडून मिळालेली माहिती अशी, कोयना विभागातील झाकडे



परिसरात राखीव वनक्षेत्रातील जंगलामध्ये नितीन साळुंखे याने दोन ठिकाणी वणवा लावला होता. तिसऱ्या वेळेस वणवा लावताना वनरक्षक मोरगिरी रोहित लोहार यांनी रात्रंदिवस गस्त करून त्याच्यावर पाळत ठेवून त्याची मोबाईलवर चित्रफित बनवली होती.

त्यानंतर नितीन साळुंखेला वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले व त्याच्यावर वन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, दोन ठिकाणी लावलेले वणवे ग्रामस्थांच्या मदतीने वेळीच विझवल्याने मोठे वन क्षेत्र जळण्यापासून वाचले. ही कारवाई उपवनसंरक्षक अदिती भारद्वाज, सहाय्यक वनसंरक्षक महेश झांजूर्णे, पाटणचे वनक्षेत्रपाल राजेश नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ. डॉ. अतुल भोसलेंची बॅटिंग

## मुख्यमंत्री रोजगार प्रशिक्षण विभागाच्या मागणीसह मांडले विविध मुद्दे

कराड : महाराष्ट्रामध्ये अनेक नवनवीन उद्योगधंदे यायला इच्छुक असून, या उद्योगांमध्ये कुशल मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी राज्यात स्वतंत्रपणे ममुख्यमंत्री रोजगार प्रशिक्षण विभागफ सुरु करण्याची आवश्यकता आहे. याबाबतची रितसर मागणी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असून, त्यांनी या मागणीबाबत सकारात्कता दर्शविली असल्याचे प्रतिपादन कराड दक्षिण विधानसभेचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी विधानसभेत केले. राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदन ठरावावर ते बोलत होते.



यावेळी बोलताना डॉ. भोसले पुढे म्हणाले, की कुशल मनुष्यबळाच्या निर्मितीसाठी स्वतंत्र ममुख्यमंत्री रोजगार प्रशिक्षण विभागफस्थापन करण्यास मुख्यमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शविली असून, या विभागात कामगार मंत्रालयाचे सचिव, कौशल्य विकास विभागाचे सचिव, काही लोकप्रतिनिधी आणि उद्योग जगतातील काही मंडळींचा समावेश असावा. जसे की, हणमंतराव गायकवाड यांनी बी. व्ही.जी.सारखा एक मोठा उद्योग निर्माण करुन हजारो हातांना काम मिळवून दिले आहे. मी त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनी मला सांगितलं की देशाबाहेर मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता आहे. आपल्या देशातल्या अनेक तरूणांना; ज्यांनी शिक्षण घेतले आहे, पण त्यांना काही कारणांनी उद्योगाची किंवा नोकरीची संधी मिळत नाही. आपण नेहमी बेरोजगारीवर चर्चा करतो. पण जर अशा पद्धतीचा विभाग विकसित केला तर आपल्या देशात कुशल मनुष्यबळाची निर्मिती करता येईल. त्यामुळे मी मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी या विभागाची लवकरात लवकर आपण स्थापना करावी. हा विभाग लवकर स्थापन झाल्यास राज्यातल्या तरुणांच्या हाताला काम मिळण्याच्या बाबतीमधले एक चांगले प्रगतीचे पाऊल ठरु शकले. देशात गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राला पहिली पसंती दिली जात आहे. त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर देशातली आणि परदेशातील गुंतवणूक वाढताना दिसत आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण अभियानाच्या माध्यमातून १ लाख ३२ हजार तरुणांना प्रशिक्षित करण्याचे काम आपण आजपर्यंत केलेले आहे आणि येणाऱ्या काळामध्ये राज्य सरकारचा मानस आहे की १० लाख तरुणांना यावर्षी प्रशिक्षित करण्याचे धोरण निश्चित केले आहे.

शक्तीपीठ महामार्गाची निर्मिती सरकारकडून चालू आहे. त्या महामार्गामुळे १२ हजार ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक आपल्या महाराष्ट्र राज्यामध्ये होणार आहे.

नागपूरपासून गोव्यापर्यंत जाणारे सगळी महत्वाची ठिकाणे जोडण्याचं काम या महामार्गाच्या माध्यमातून होणार आहे आणि त्याचा देखील फायदा निश्चित स्वरूप येणाऱ्या काळामध्ये आपल्याला होताना दिसणार आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पावसाळ्यानंतरच ?

## सर्वोच्च न्यायालयाने दिली पुढची तारीख

नवी दिल्ली, : राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका प्रकरणी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. राज्य सरकारकडून तुषार मेहता यांनी पुन्हा वेळ मागून घेतला आहे. दोन्ही बाजूंच्या याचिकाकर्त्यांमध्ये संभ्रम आहे. त्यामुळे न्यायालयाने कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे. त्यानंतर आम्ही पुढच्या वेळी सुनावणी करू, असे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर गेल्या आहेत. आता पावसाळ्यानंतरच या निवडणुका होण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची पुढील सुनावणी ६ मे रोजी होणार आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासक राज सुरू आहे. मुंबई, पुण्यासह अनेक महानगरपालिका आणि जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये ३ ते ४ वर्षांपासून निवडणुका झालेल्या नाहीत. त्यामुळे सर्वांचे लक्ष आता या निवडणुकांकडे लागले आहे. लोकसभेपाठोपाठ राज्याच्या विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याच्या हालचाली सुरू होतील, अशी अपेक्षा होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने आजची सुनावणी पुन्हा पुढे ढकलली आहे. त्यामुळे या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडल्या आहेत.

ओबीसी आरक्षणाच्या विषयावरून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. त्यात प्रभाग फेररचनेचा मुद्दा आहे. त्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पूर्ण झाली नाही. राज्य सरकार आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणारे याचिकाकर्ते या दोघांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका हव्या आहेत. परंतु काही मुद्द्यांवर दोन्ही बाजूंमध्ये मतभेद आहेत. त्यामुळे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आहे.

निवडणुका पावसाळ्यानंतरच होणार ?

सर्वोच्च न्यायालयात आज या संदर्भात निर्णय झाला नाही. यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पावसाळ्यापूर्वी होणेची शक्यता आहे. कारण होळीमुळे ९ ते १६ मार्च सर्वोच्च न्यायालयास सुट्टी आहे. त्यानंतर न्यायालयाकडून तारीख दिली जाईल. त्या तारखेवर सुनावणी होईल. त्या तारखेला सुनावणी झाली नाही तर न्यायालयाला उन्हाळी सुट्टी लागेल. यामुळे हा विषय लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

# पंचायतराज अभियानात खंडाळ्याची बाजी

सातारा : ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायतराज संस्थांमधून प्रशासकीय व्यवस्थापन व विकासामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या यशवंतराव चव्हाण पंचायतराज अभियानामध्ये खंडाळा पंचायत समितीने विभागात तिसरा क्रमांक मिळवला.



या अभियानांतर्गत विभागस्तरावर तीन पंचायत समित्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. यशवंत पंचायतराज अभियान २०२४-२५ अंतर्गत द्विस्तरीय कमिटीने खंडाळा पंचायत समितीच्या २०२३-२४ मधील कामांची विभागस्तरीय तपासणी दि. १४ फेब्रुवारी रोजी केली. यामध्ये कोल्हापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक सुषमा देसाई, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्य दीपाली पाटील यांच्या पथकाने अभियानात नमूद शाश्वत विकासाचे ध्येय ठेवून, पंचायत समितीने राबविलेल्या योजना व त्यासंबंधीचे रेकॉर्ड याबाबत एकूण २०० गुणांसाठी तपासणी केली. खंडाळा पंचायत समितीने दिव्यांगांच्या खेळांच्या स्पर्धा, महिला सबलीकरण, शेतीच उत्पन्न वाढवणे, बांबू लागवड, शिष्यवृत्ती, गुणवत्तापूर्ण पायाभूत सुविधा, शिक्षण, पशुसंवर्धन, आरोग्य, ग्रामपंचायत बांधकाम, महिला व बालकल्याण, लघुपाटबंधारे व अन्य विभागांमधील वैशिष्ट्यपूर्ण कामे आणि त्यांचे फलित याची पाहणी केली होती. या अभियानांतर्गत केलेल्या कामासाठी विभागस्तरीय पारितोषिक निवड समितीच्या बैठकीत खंडाळा पंचायत समितीचा तृतीय क्रमांक घोषित करण्यात आला.ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पालकमंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, खा. उदयनराजे भोसले, खा. नितीन पाटील, सर्व आमदार, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे माजी सदस्य व पदाधिकाऱ्यांचे नेतृत्व, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश घुले यांच्या मार्गदर्शनाखाली गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, सहाय्यक गट विकास अधिकारी प्रकाशकुमार बोंबले यांचा पाठपुरावा, समन्वय, सहकार्य आणि पंचायत समितीमधील कार्यालयप्रमुख आणि कर्मचारी यांच्या कामामुळे खंडाळा पंचायत समितीला हा पुरस्कार मिळाला.

# बाल विकास मेळावा मुलांच्या विकासाला चालना देतो – विभुते

पुसेसावळी : मुलांच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासाला बाल विकास आनंद मेळावा चालना देतो. त्यामुळे हा बाल आनंद मेळावा महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी उपक्रम आहे. या मेळाव्यात मुलांना कला, संगीत आणि इतर सर्जनशील क्रियाकलापांचा अनुभव घेता येतो, त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो. तसेच त्यांना एकत्र येण्याची, सांघिक काम शिकण्याची आणि एकमेकांशी संवाद साधण्याची संधी मिळते, असे मत गटशिक्षणाधिकारी सोनाली विभुते यांनी व्यक्त केले.

जयराम स्वामींचे वडगाव येथे आयोजित केलेल्या वडगाव केंद्राच्या केंद्रस्तरीय बाल आनंद मेळाव्यात त्या बोलत होत्या. कार्यक्रमास वर्धन ॲग्रोचे कार्यकारी संचालक विक्रमशील कदम, माजी सरपंच संतोष घार्गे, शिक्षण विस्तार अधिकारी संगीता गायकवाड, चंद्रकांत सुतार, केंद्रप्रमुख रफिक मुलाणी, धनाजी पवार यांची उपस्थिती होती. विक्रमशील कदम म्हणाले, ११ बाल आनंद मेळावा मुलांना आपली प्रतिभा दाखवण्यासाठी, नवीन गोष्टी शिकण्यासाठी आणि जीवनातील सकारात्मक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी आदर्श ठरतो. हा मेळावा त्यांच्या मनोबलाला सशक्त करतो, त्यांना नवीन मित्र मिळवण्याची आणि विविध संस्कृती व विचारसरणीचा आदान-प्रदान करण्याची संधी देतो. यामुळे मुलांच्या जीवनात आनंद आणि उत्साहाचा संचार होतो आणि त्यांच्या भविष्यात एक सकारात्मक दृष्टीकोन तयार होतो.

जयराम स्वामींचे वडगाव, चोराडे, गोरेगाव वांगी, नांदणी वस्ती, भैरवनाथ मळा, निकम मळा, रहाटणी, भांडाचा मळा, कातवडी, लाडेगाव रेवली, वांझोळी, उंचीठाणे या शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, पोवाडा, लावणी, कोळी गीते, भक्ती गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमास केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, ग्रामस्थ उपस्थित होते.

# भाजपकडून सौ. चित्रलेखा माने–कदम यांना बळ देणार

रहिमतपूर : समाज व राष्ट्र उभारणीसाठी सौ. चित्रलेखा माने-कदम समर्पित भावनेने कार्य करीत आहेत. समाजाला बळ देणारे असे नावीन्यपूर्ण उपक्रम महाराष्ट्राच्या पाठीवर क्वचित एखादी संस्था राबवित असेल. अशा उपक्रमातून महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान होत असतो. त्यांना अधिकाधिक काम करण्यास ऊर्जा मिळत असते. यासाठी भाजपच्या माध्यमातून सौ. चित्रलेखा कदम यांना बळ दिले जाईल, अशी ग्वाही राज्याचे महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.



बडोदा संस्थान व महाराज सयाजीराव गायकवाड यांना घडविणाऱ्या रहिमतपूरच्या माहेरवाशीण महाराणी जमनाबाई गायकवाड यांचे स्मारक रहिमतपूर येथे उभे करण्यासाठी शासनाकडून सहकार्य केले जाईल, असे अभिवचन बावनकुळे यांनी यावेळी दिले. येथील पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्यावतीने श्रीमती मंगलताई भीमराव घोरपडे (मत्यापूर), श्रीमती सुमती धोंडदेव जांभेकर (चिपळूण), सौ. ललिता वसंत केसव (सातारा) यांना ना. बावनकुळे यांच्या हस्ते महाराणी जमनाबाई गायकवाड आदर्श माता राज्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर कराड उत्तरचे आ. मनोज घोरपडे, आ. विक्रांत पाटील, भाजप भाजप महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा व पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सौ. चित्रलेखा माने-कदम, भाजपचे सरचिटणीस राकेश पांडे, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, सातारा लोकसभा संयोजक सुनील काटकर, भाजप कोअर कमिटीच्या जिल्हा सदस्या डॉ. सौ. प्रियाताई महेश शिंदे, हर्षवर्धन कदम, सौ. प्रियंका कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

ना. बावनकुळे म्हणाले, सौ. चित्रलेखाताई स्वत:साठी, संस्थेसाठी काही मागत नाहीत हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. समाजाची, महिलांची काळजी त्या घेत आहे. महिला सक्षम व्हाव्यात, यासाठी महाराणी जमनाबाई गायकवाड यांचे स्मारक रहिमतपूरमध्ये व्हावे ही त्यांची तळमळ आहे. सौ. चित्रलेखाताईंना हवी ती मदत राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून केली जाईल. आ. मनोज घोरपडे म्हणाले की, आईवडीलांच्या संस्कारातून आपण घडतो. त्यांच्या त्यागातून उभा राहतो हे विसरता कामा नये. पंचक्रोशीने योग्य निवड करुन आदर्श मातांचा सन्मान केला. महाराणी जमनाबाई गायकवाड स्मारकासाठी पाठपुरावा करेन.

सौ. चित्रलेखा माने – कदम प्रास्तविकात म्हणाल्या, आई संवेदनशील असते. ती स्वत: कष्ट सोसते, आपल्या मुलांच्या भविष्यासाठी धडपडते. काही माता समाजालाच अपत्य मानतात. त्यांचे काम जगावेगळे असते. अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्याचाहा उपक्रम पंचवीस वर्षे आयोजन करीत आहे. वैभव साने यांनी आई असते श्रावण हे गीत सादर केले. दीपक साबळे यांनी सूत्रसंचालन केले. माउली एज्युकेशन केअरच्या संचालिका सौ. प्रियंका कदम यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी विठ्ठल बलशेटवार, संग्राम घोरपडे, विक्रम घोरपडे, सौ. अंजली जाधव, संतपराव माने, वासुदेव माने, भीमराव पाटील, कोंडीराम माने, शंकरराव भोसले, घोरपडे, जांभेकर, केसव कुटुंबीय यांसह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# पाटणमध्ये एकात्मिक बाल विकास प्रकल्पावर मोर्चा

पाटण : सातारा जिल्हा पुर्व प्राथमिक शिक्षिका व सेविका संघाच्या वतीने गुरूवारी पंचायत समिती व एकात्मिक बाल विकास प्रकल्पावर विविध मागण्यांसाठी मोर्चा काढण्यात आला. जिल्हा व तालुका संघाचे पदाधिकारी व अंगणवाडी सेविका व मदतनीस मोर्चात सहभागी झाल्या होत्या. प्रथम पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले व मोर्चा नवीन बसस्थानक, झेंडा चौक मार्गे एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या कार्यालयात दाखल झाला.

एकात्मिक बाल विकास प्रकल्पाचे कनिष्ठ सहाय्यक के.डी. लाड व सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश भुजबळ यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. सदर निवेदनात प्रकल्प अधिकारी मनमानी कारभार करत असुन पर्यवेक्षिका सेविका व मदतनीस यांना नाहक त्रास देत आहेत. जीपीएस लोकेशन बाबत सायंकाळी पाच वाजेपर्यंत सक्ती, सेविका व मदतनीस यांना मानसिक छळ चालला असून या बाबतीत योग्य ती दखल घ्यावी, सेविका व मदतनीस यांचे प्रश्‍न संदर्भात संघटनेचे शिष्टमंडळ प्रकल्प अधिकारी यांना भेटण्यासाठी गेले असता प्रकल्प अधिकाऱ्यांनी अपमानास्पद वागणूक दिली आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचा चाललेला मानसिक व शारीरिक छळ थांबवून प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांना समज देण्यात यावी. याबाबत योग्य ती कारवाई केली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# कोरेगाव कचरामुक्त करण्याच्या अभियानास प्रारंभ : उपनगराध्यक्ष

कोरेगाव : कोरेगाव शहरातील कचरा समस्येवर मार्ग काढण्यासाठी नगरपंचायतीच्यावतीने एमआयडीसीतील पंप हाउसच्या पाठीमागे ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित केला जात आहे. तिथे कंपोस्ट पीठ उभारण्याचे काम सुरू केले आहे. यामुळे कोरेगाव शहर कचरामुक्तीच्या अभियानास प्रारंभझाला असल्याची माहिती उपनगराध्यक्ष राहुल बर्गे यांनी दिली.आ. महेश शिंदे, जिल्हा नियोजन समिती सदस्य राहुल बर्गे, सुनील खत्री, माजी नगराध्यक्ष राजाभाऊ बर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नगराध्यक्षा दिपाली महेश बर्गे, मुख्याधिकारी विनोद जळक व नगरसेवकांच्या सहकायनि कचरा प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित केला जात आहे.



या कामावर व्यक्तिगत लक्ष दिले जात असून ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी कंपोस्ट पीठ उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

या कामाची पाहणी उपनगराध्यक्ष राहुल बर्गे यांनी करून अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.दरम्यान, हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर शहरातील ओला कचऱ्यावर कायमस्वरूपी मार्ग निघणार आहे. लवकरच हा प्रकल्प पूर्ण होऊन शहराच्या सेवेत दाखल होईल, असा विश्वसही त्यांनी व्यक्त केला.

# जावली तालुक्याचे शैक्षणिक कार्य कौतुकास्पद : मुजावर

## भणंग केंद्राच्या बाल आनंद मेळाव्यास भेट

सातारा, : शैक्षणिक गुणवत्तेमध्ये जावली तालुका अग्रेसर असून जावली तालुक्यातील भणंग केंद्राचे शैक्षणिक कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार सातारा जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी शबनम मुजावर यांनी काढले.

भणंग केंद्रातील विद्यार्थ्यांचा बाल आनंद मेळावा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भणंग, ता. जावली येथे आयोजित केला होता. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी सौ. संजीवनी मुळे, भणंगचे सरपंच गणेश जगताप, उपसरपंच हाफिजा मोमीन, केंद्रप्रमुख मीलन मुळे, मुख्याध्यापक अशोक लकडे, आशा साळुंखे, मंगल पिसाळ, उर्मिला कदम, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवींद्र जाधव, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सत्वशीला जाधव, पत्रकार मोहन जगताप, अजय कदम, शेखर जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

बाल आनंद मेळाव्यात केंद्रप्रमुख मीलन मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली भणंग केंद्रातील भणंग, ओझरे, बिभवी, मोरावळे, खामकरवाडी, केंजळ, केसकरवाडी, रिटकवली, आगलावेवाडी, कुंभारगणी या शाळांचा विशेष सहभाग होता. या बाल आनंद मेळाव्यात विविध



उपक्रम घेण्यात आले. प्रारंभी विविध वेशभूषांसह विद्यार्थ्यांनी लयबद्ध संचलन केले. बिभवी, ओझरे, मोरावळे या शाळेतील विद्यार्थ्यांनी अप्रतिम लेझीम प्रकार सादर केले. भणंग शाळेतील विद्यार्थ्यांनी योगासने करुन उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर तीन पायांची शर्यत, चालता बोलता प्रश्नमंजूषा, चेहरा रंगवणे, बादलीत चेंडू टाकणे, संगीत बॉल,जिलेबी खाणे असे विविध मनोरंजक खेळ घेऊन विद्यार्थ्यांनी आनंद घेतला. शिक्षक व पालकांनी संगीत खुर्चीची मजा घेतली. मध्यंतराला सर्व उपस्थितांना स्नेहभोजन देण्यात आले. यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अफलातून नृत्याविष्कार सादर केले. बक्षीस वितरण कार्यक्रमात शिक्षणाधिकारी शबनम मुजावर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व शैक्षणिक साहित्य देऊन विद्यार्थी व शिक्षकांचा गौरव करण्यात आला. भणंग केंद्रामध्ये उल्लेखनीय कार्य करुन पदोन्नती व बदली झालेल्या डी. टी. धनावडे, बळवंत पाडळे, ज्ञानेश्वर वेंदे, लता साळुंखे, सुनीता कामटे, अण्णासाहेब दिघे, शंकर ओंबळे या शिक्षकांना केंद्रप्रमुख मीलन मुळे, सरपंच गणेश जगताप यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व पुस्तक भेट देऊन सन्मानित करण्यात आले. या बाल आनंद मेळाव्याला गटविकास अधिकारी डॉ. नीलेश पाटील, गटशिक्षणाधिकारी संजय धुमाळ, शिक्षण विस्तार अधिकारी चंद्रकांत कर्णे, शिक्षक बँकेचे माजी संचालक शंकर जांभळे यांनी शुभेच्छा दिल्या.अशोक लकडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. गणेश जगताप व लहुराज जाधव यांनी सूत्रसंचालन केले. आशा साळुंखे यांनी आभार मानले.

मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी अशोक पाटील, दीपाली दुंदळे, राकेश बोडके, अमिता एरंडे, रुक्मिणी शेडगे, संगीता मस्के, नेहा जाधव, अमित आगुंडे, विश्वास भिसे, विशाल महाजन, प्रणिता गायकवाड, अर्चना काळेल, दीपाली वांद्रे, पंकजा सुतार, शरद गव्हाणे, स्वप्नाली पार्टे, शिवानी मोरे, शुभांगी शिरटावले या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# वाचनालये ही माणसे घडवण्याचे सुसंस्कृत केंद्र : राजेंद्र चोरगे

मेढा : मोबाईलच्या जमान्यात पुस्तक वाचनाकडे दुर्लक्ष होत असले तरी नियमीत काहीतरी चांगले वाचले पाहिजे. वाचाल तर वाचाल याप्रमाणे वाचनालये ही माणसं घडविण्याचे सुसंस्कृत केंद्र असून ही केंद्र गावोगाव उभी राहून जीवंत राहिली पाहिजेत, असे मत बालाजी चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र चोरगे यांनी व्यक्त केले.



येथील म. गांधी वाचनालयाचे वतीने आयोजीत केलेलेल्या पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख कारण अतिथी म्हणून माजी सहाय्यक पोलीस आयुक्त राजेंद्र मोकाशी, व्याख्याते श्रीधर साळुंखे, वाचनालयाचे अध्यक्ष सुरेश पार्ट, सुर्वकांत देशमुख, कांतीभाई देशमुख, बबनराव वारागडे, प्रा. तुकाराम ओंबळे, मुरलीधर काशिलकर शेठ, आदिनाथ ओंबळे, प्रथमेश

क्षीरसागर, प्रियांका किर्वे, अंगणवाडी पतसंस्थेच्या चेअरमन सुनिता पार्ट इत्यादी मान्यवर उपस्थीत होते. यावेळी बोलताना राजेंद्र मोकाशी म्हणाले, मेढा केळघर परिसरातील सर्वसामान्य नागरीकाचे जीवनमान उंचावे यासाठी स्व. विजयराव मोकाशी यांनी बोंडारवाडी धरणाचे स्वप्न पाहिले. शांत, संय्यमी व मनमिळावू स्वभाव त्यांचा होता. त्याचे वालपणापासूनचे ५५ वर्षाचे सहकारी नारायणशेठ सुर्वे यांना जलनायक स्व. विजयराव मोकाशी जलरत्न पुरस्कार देवून सन्मानित केले ही त्यांच्या कार्याची पोहोच पावती आहे.


श्रीधर साळुंखे म्हणाले, बहुजन समाजासाठी तळागाळात काम करणाऱ्यांचा म. गांधी वाचनालयाने विविध पुरस्कार देवून सन्मान केला ही कौतुकाची बाब आहे.चालू वर्षीचा मानाचा जलनायक स्व. विजयराव मोकाशी जलरत्न पुरस्कार नारायणशेठ सुर्वे यांना तर जीवन गौरव पुरस्कार पांडुरंग महादेव देशमुख (गुरुजी) स्व. मंदाकिनी ओंबळे आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार शाहीर नारायण कदम धोंडेवाडी ता. खटाव, स्व. इंदुमती मोकाशी यांचे स्मरणार्थ आदर्श माता पुरस्कार सुंदराबाई कारंडे वरोशी, कै. लक्ष्मण काशीलकर यांच्या स्मरणार्थ यशस्वी उद्योजक पुरस्कार नामदेव वांगडे-कौस्तुभपेट्रोलियम यांना तर स्व. जनाबाई पार्टे यांचे स्मरणार्थ आदर्श माता यांना मान्यवरांचे हस्ते बहाल करण्यात आला. त्याचबरोबर कै. शामराव शिरसागर जिल्हास्तरीय आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार लक्ष्मण घाडगे श्री खंडू आई देवी मोफत वाचनालय म्हावशी, जि. सातारा, स्व. मंदाकिनी ओंबळे आदर्श शिक्षिका पुरस्कार नीलिमा आडके-जि. प. शाळा बेलोशी यांना, त्याचबरोबर स्व. महादेव जंगम आदर्श ग्रंथपाल पुरस्कार बाबासाहेब गाडे-पद्मश्री ग. गो. जाधव सार्वजनिक वाचनालय यशवंत नगर वाई यांना तर पुरस्कार रंजना करंजेकर व सुनिता गोरे यांना, स्व. सावित्री थत्ते आदर्श महिला वाचक पुरस्कार अनिता जाधव, नीता झेंडे, मयुरी चव्हाण यांना मान्यवरांचे हस्ते वितरीत करून सन्मान करण्यात आला.जयश्री माजगांवकर, ॲड. निलम पवार, जावेद शेख, मारूती देशमुख, संजय सुर्वे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

# उन्हाळ्यामुळे शाळा सकाळच्या सत्रात

## माध्यमिक विभागाचा निर्णय : सकाळी ७.३० ते १२ यावेळेत शाळा

सातारा : उन्हाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. उन्हाची दाहकता दिवसभर जाणवत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्रास होवू नये त्यासाठी सातारा जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागामार्फत दि. १ मार्चपासून शाळा सकाळच्या सत्रात भरवण्यात येणार आहेत.

सध्या दहावी व बारावीच्या परीक्षा सुरु आहेत. त्यातच उन्हाचा कडाका दिवसेंदिवस वाढत चालला आहे. जिल्ह्याच्या काही भागात पाण्याचा प्रश्नही भेडसावू लागला आहे. विद्यार्थ्यांना उन्हामध्ये ये-जा करावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांना उन्हाच्या झळा बसू नयेत. जिल्ह्यातील बहुतांश माध्यमिक शाळा या पत्र्याच्या आहेत. त्यामुळे तीव्र उन्हाचा



विद्यार्थ्यांना त्रास होतो.

उन्हाळ्यात वाढत्या तापमान आणि उन्हाच्या झळा यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते.तसेच माध्यमिक शिक्षण विभागाच्या वार्षिक सुट्ट्यांच्या वेळापत्रकात १ मार्च पासून सकाळच्या सत्रात सकाळी ७.३० ते १२ या वेळेत शाळा भरवण्यात यावी, अशा सूचना जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी प्रभावती कोळेकर यांच्या आहेत. त्यामुळे सातारा जिल्ह्यातील माध्यमिक शाळा सकाळच्या सत्रात सुरू झाल्या आहेत. यामुळे प्राथमिक शिक्षण विभाग सकाळच्या शाळा कधी सुरू करणार याकडे विद्यार्थ्यांसह शिक्षकांचे लक्ष लागून राहिले आहे.

दरवर्षी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर सुट्ट्यांच्या वेळापत्रकानुसार मार्च महिन्यात माध्यमिक शाळा सकाळच्या सत्रात भरवली जात आहे. आता दिवसेंदिवस उन्हाची दाहकता वाढू लागली आहे. त्यामुळे माध्यमिक शाळा सकाळी ७.३० ते १२ या वेळेत भरवण्यात येत आहेत.

**- प्रभावती कोळेकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**

# पुसेगाव पोलिस ठाणे पुन्हा राज्यात बेस्ट; केंद्रीय गृह मंत्रालयाचे शिक्कामोर्तब : मुख्यमंत्र्यांनी केला गौरव

खटाव : केंद्रीय गृह मंत्रालयाने २०२३ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात सातारा जिल्ह्यातील पुसेगाव पोलिस ठाण्याने सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्रात नंबर वनचे स्थान मिळवले आहे. राज्यात बेस्ट ठरलेल्या पुसेगाव पोलिस ठाण्याचा शनिवारी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

तत्कालीन एसपी अजयकुमार बन्सल, सध्याचे एसपी समीर शेख, तत्कालीन डिवायएसपी गणेश किंद्रे, सध्याचे पंढरपूरचे पोलिस निरिक्षक विश्वजीत घोडके यांच्या कार्यकाळात केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सर्वोत्कृष्ट पोलिस ठाणे प्रतियोगितेत २०२२ साली पुसेगाव पोलिस ठाणे राज्यात अव्वल आणि देशात टॉप टेनमध्ये आले होते. तत्कालीन पोलिस उपनिरिक्षक बाळासाहेब लोंढे यांच्या कार्यकाळात पुन्हा एकदा २०२३ सालासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पुसेगाव पोलिस ठाण्याचा प्रस्ताव पाठवण्यात आला होता. स्पर्धेचे सर्व निकष पूर्ण करण्यासाठी एसपी समीर शेख, तत्कालीन एसपी अजयकुमार बन्सल, डिवायएसपी किंद्रे, पोलिस उपनिरीक्षक लोंढे, सपोनि संदीप शितोळे, सपोनि चेतन मछले आणि सध्याचे सपोनि संदीप पोमण यांच्यासह सहकारी कर्मचारी, अधिकाऱ्यांनी प्रयत्न केले होते. प्रसिद्धी माध्यमे, पुसेगाव पोलिस ठाण्याच्या अखत्यारितील नागरिकांच्या प्रयत्नांना यश येवून सलग दुसऱ्यांदा केंद्रीय गृह मंत्रालयाच्या पडताळणीत पुसेगाव पोलिस ठाणे राज्यात अव्वल ठरले आहे.

एएसआय सुरेश चव्हाण, आनंदराव जगताप, सचिन माने, सुधाकर भोसले, सचिन जगताप, अमृता चव्हाण आणि सहकाऱ्यांनीही पोलिस ठाण्याचे कामकाज अपटूडेट ठेवण्यात परिश्रम घेतले होते.

पुसेगाव पोलिस ठाण्यात कर्तव्य पार पाडताना यापूर्वी नंदकुमार पिंजण, दयानंद ढोमे, राजेंद्र सावंत्रे, धनंजय पिंगळे, विश्वजीत घोडके, संभाजीराव गायकवाड, उमेश तावसकर, घाडगे, संजय बोंबले या अधिकाऱ्यांनी पुसेगाव पोलिस ठाण्याचा कारभार समाजाभिमुख पोलिसींगद्वारे चालवण्याची परंपरा सुरु ठेवली होती. त्यानंतरच्या सर्व अधिकाऱ्यांनी त्याच पावलावर पाऊल टाकत वाटचाल केल्याने पुसेगाव पोलिस ठाण्याला हा सर्वोच्च पुरस्कार सलग दुसऱ्यांदा प्राप्त झाला आहे. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल पुसेगाव पोलिस ठाण्याचे मान्यवरांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# कौशल्य विकास करणारे उपक्रम दहिवडी कॉलेजमध्ये व्हावेत : प्रभाकर देशमुख

दहिवडी : सांघिक भावनेने एकत्र येऊन अतिशय मेहनतीने व मन लावून तयार केलेल्या पदार्थ व वस्तूंना मिळालेला प्रतिसाद पाहून दहिवडी महाविद्यालयातील विद्यार्थी कमालीचे हरखून गेले. दैनंदिन शिक्षण घेण्याबरोबरच कौशल्य विकसित करण्यासाठी नवनवीन उपक्रम राबवणे गरजेचे असल्याचे मत रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रभाकर देशमुख यांनी व्यक्त केले.

व्यावसायिक कौशल्य आत्मसात करता यावे यासाठी दहिवडी कॉलेज दहिवडीत वाणिज्य विभागाच्यावतीने ट्रेड फेअर तर रसायनशास्त्र विभागाच्यावतीने मरसायन जत्राफ आयोजित करण्यात आली होती.

याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य सुनील जाधव, अजित पवार, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय खेत्रे,उपप्राचार्य



डॉ. अनिल दड्स, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. एम. एन. म्हेत्रे, रासायनिक विभाग प्रमुख प्रा. एम. जे. लुबाळ, प्रा. शुभदा कदम उपस्थितहोते. दरम्यान, मट्रेड फेअरफमध्ये दीडशे विद्यार्थ्यांनी बारा स्टॉल लावले होते. महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी या छोट्या दुकानांच्या माध्यमातून विक्रीसाठी आणलेल्या पदार्थांचा मनमुराद आस्वाद घेतला. तसेच रसायन जत्रा या उपक्रमामध्ये या विभागातील विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली वेगवेगळी उत्पादने विक्रीसाठी ठेवली होती

# सफाई मित्रांना आरोग्य आणि स्वच्छतेचे प्रशिक्षण

महाबळेश्वर : 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४ व माझी वसुंधरा ५.०' अंतर्गत महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या संकल्पनेतून स्वच्छतेची महत्वाची भुमिका बजावणाऱ्या सफाई मित्रांसाठी व्यावसायिक आरोग्य आणि स्वच्छतेवर या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण पार पडले.डॉ. पंकज दास आणि अमित चव्हाण या दोन तज्ज्ञ प्रशिक्षकांमार्फत हे प्रशिक्षण देण्यात आले. स्वच्छता कामगारांसाठी दैनंदिन काम करत असतान त्यांनी स्वत:ची घ्यावयाची काळजी तसेच त्यांचे आरोग्य आणि स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करत होते. या प्रशिक्षण सत्रात सुरक्षा उपकरणांचा योग्य वापर कसा करावा हे दाखवण्यासाठी थेट प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

यावेळी मुख्याधिकारी योगेश पाटील, स्वच्छता निरीक्षक प्रमोद कुंभार, लेखापरीक्षक सचिन कदम, लेखापाल प्रशांत मस्के, बांधकाम अभियंता मुरलीधर धायगुडे यांच्या हस्ते सर्व सफाई मित्रांना व्यावसायिक ओळखपत्रे प्रदान करण्यात आली. उन्हाळ्याच्या उष्णतेचा



सामना करण्यासाठी पाण्याच्या बाटल्या आणि टोप्या वाटप करण्यात आल्या.

योगेश पाटील यांनी सांगितले की, आपणा सर्वांमुळे गेल्या स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियानात आपण मोठे यश प्राप्त करू शकलो होतो. हे प्रशिक्षण तुमच्या सर्वांसाठी उपयुक्त ठरेल. आपण सर्वजण दैनंदिन काम करत असताना सर्व सुरक्षा उपकरणे वापरावीत. त्यामुळे आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल.

कार्यक्रमास ९० पेक्षा अधिक सफाई मित्र उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुकादम मनोज चव्हाण, आयुब वारुणकर, व्ही.व्ही.के. चे सुपरवायजर मंथन मोहिते, आकाश लोहार, स्वच्छ भारत समन्वयक वैभव साळुंखे, हिलदारीचे राम भोसले व सर्व टीम यांनी परिश्रम घेतले.

# निवृत्तांच्या अडचणी सोडवण्यास प्रशासन कटिबध्द

## नीलेश घुले ; झेडपीतील १६ कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्तीबद्दल सत्कार

सातारा : सेवानिवृत्तीपूर्वीच कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन प्रयत्न करत आहे. सेवानिवृत्तीदिवशी सेवानिवृत्ती लाभ मंजुरीचे आदेश देण्यात येत आहेत. सेवानिवृत्तीनंतरही कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी प्रशासन कटिबध्द आहे, असे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश घुले यांनी सांगितले.

फेब्रुवारी महिन्यात सेवानिवृत्त होणाऱ्या सातारा जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या सर्व संवर्गातील वर्ग ३ व वर्ग ४ अशा एकूण १६ कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या अंतिम लाभाचे आदेश देण्याचा कार्यक्रम निलेश घुले यांच्या हस्ते स्थायी समिती सभागृहात झाला. त्यावेळी ते बोलत होते. सामान्य



प्रशासन विभागाचे २, प्राथमिक शिक्षण विभागाचे ८, बांधकाम उत्तर विभाग विभागाचा १ कर्मचारी, आरोग्य विभागाचे ४ व पशुसंवर्धन विभागाच्या एका कर्मचाऱ्याचा यामध्ये समावेश आहे. सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सर्व लाभ सेवानिवृत्तीपूर्वी देण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी अर्थ व सामान्य प्रशासन विभागामार्फत विविध विभागांना सूचना देऊन पाठपुरावा केल्याचे निलेश घुले यांनी प्रास्ताविकात सांगितले. यावेळी विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरच्या लाभाचा आदेश व सेवापूर्ती गौरवचिन्हाचे वितरण करण्यात आले.

सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांमधून श्रीमती मेघा गाढवे (आरोग्य सेविका प्राथमिक आरोग्य केंद्र परळी) व श्रीमती सुचेता हंकारे (मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंप्रद ता. फलटण) यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सामान्य प्रशासन विभागातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. जिल्हा परिषद बिरामणेवाडी (ता. जावळी) शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली गोडसे यांनी सूत्रसंचालन केले. विस्तार अधिकारी श्रीमती देवता साळुंखे यांनी आभार मानले.

# जि.प.शाळेतील संस्कार भावी पिढी घडवतात

## राजूभैय्या भोसले; अंबवडे बुद्रुक जि.प.शाळेचे शताब्दी वर्ष उत्साहात

सातारा : अंबवडे बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेने शंभरी गाठली म्हणजे शताब्दी वर्ष गाठले. या एवढ्या मोठ्या कालावधीत या शाळेने खूप विद्यार्थी घडवले. एवढेच



नव्हे तर या शाळेने अंबवडे गावाच नव्हे तर परळी भागाला सर्व क्षेत्रातील अधिकारी उद्योजक याचबरोबर चांगले शेतकरीही घडवले. अलीकडील काळात जिल्हा परिषद शाळा टिकवणे जोखमीचे बनले आहे, असे प्रतिपादन राजूभैय्या भोसले यांनी अंबवडे बुद्रुक येथील शाळेच्या शताब्दी सोहळ्याप्रसंगी केले.

ते पुढे म्हणाले, अंबवडे बुद्रुक गावाने शेती दुग्ध व्यवसायाबरोबरच 'गड किल्ल्यांचे गाव' म्हणून ही ओळख मिळवली आहे. या गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबध्द आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेचा शताब्दी समारंभामधील आजी-माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्यात, आदर्श सरपंच भास्करराव पेरे-पाटील आणि विविध क्षेत्रातील मान्यवर व आजी माजी विद्यार्थी, सेवानिवृत्त सह विद्यमान शिक्षक यांच्या उपस्थितीत झाला. याप्रसंगी विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. या समारंभात भास्करराव पेरे-पाटील म्हणाले, शाळेच्या शताब्दीसाठी महिला, बालक, पुरुष सगळे गाव एकदिलाने एकत्र आले, असाच एकोपा टिकून ठेवून, त्याचा उपयोग गावाच्या सर्वांगीण विकासासाठी केला पाहिजे.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून विद्यार्थ्यांचा विविध कला गुण दर्शनाच्या कार्यक्रमाने करण्यात आली. याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर व आजी-माजी विद्यार्थी, विद्यमान विद्यार्थी, शिक्षक यांची मनोगते झाली. यामध्ये ज्येष्ठ माझी विद्यार्थी ऐंशी वर्षाचे आजोबांपासून ते इयत्ता पहिलीमधील सात वर्षाच्या विद्यार्थ्यांनी मनोगतामधून शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला, त्यामुळे संपूर्ण वातावरण भावनिक झाले. शाळेच्या वतीने सेवानिवृत्त शिक्षक, विद्यमान शिक्षकांचा सत्कार शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी शाळेतून घडलेले विविध क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केलेले मान्यवर शाळेचे माजी विद्यार्थी उपस्थित होते. त्यांच्यासाठी संयोजकांनी विविध कार्यक्रम, स्नेह भोजन आयोजित केले होते.

# विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव

पाचवड : विज्ञान प्रदर्शने विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देत ज्ञानाच्या कक्षा वाढवण्यासाठी उपयुक्त ठरतात. यासाठी शिक्षक आणि पालक यांनी समन्वय राखत बालमनावर संस्कारांची फुंकर घातल्यास उद्याचे वैज्ञानिक व जिज्ञासू नागरिक घडवण्याचे सामर्थ्य विज्ञान प्रदर्शनात असतो, असे प्रतिपादन वाई तालुक्याचे सहकार निबंधक अनिल क्षीरसागर यांनी केले.

पाचवड ता. वाई येथे तिरंगा इंग्लिश मेडियम स्कुलच्या प्रांगणात आयोजित विज्ञान प्रदर्शन व कला प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून वाई तालुक्याचे सहकार निबंधक अनिल क्षीरसागर बोलत होते. यावेळी विशेष उपस्थिती म्हणून आरबीआयचे निवृत्त अधिकारी अविनाश




जोशी हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे मार्गदर्शक जयवंत पवार होते. अनिल क्षीरसागर पुढे म्हणाले, शालेय जीवनात होणारे संस्कार हे प्रत्येक बालमनावर होत असताना. त्यांना भविष्याची चाहूल देत वर्तमानात जिज्ञासा वृत्ती शिकवली जाते.

यामुळेच विज्ञान प्रदर्शन हे फक्त पाहण्यासाठी नसून अनुभवण्यासाठी असतात. संस्थेचे मार्गदर्शक जयवंत पवार यांनी ग्रामीण भागातील विद्यवत्ता आणि विद्यार्थी यांचा अहवाल मांडून अनेक माजी विद्यार्थी आज उच्च पदस्थ व देश सेवेत काम करतात हे सांगून तिरंगा स्कुल नेहमीच अग्रगण्य राहण्यासाठी सर्वतो परी आम्ही प्रयत्न करतो असे सांगितले. मुख्याधापिका वैशाली कुंभार यांनी सुत्रसंचालन केले तर आभार प्राचार्य वनिता पवार यांनी मानले. यावेळी प्राचार्य आर. एस. पाटील, बांधकाम विभागाचे अधिकारी रोहित पाटील, प्रकाश पवार आदी उपस्थित होते.

# रहिमतपूर पालिकेचा ९० कोटींचा अर्थसंकल्प

## रस्त्यांसाठी चार कोटींची तरतूद; पाणीपुरवठा, भुयारी गटर योजनेला महत्त्व

कोरेगाव : रहिमतपूर नगरपरिषदेचे १४ लाख ५२ हजार ५७५ रुपयांचे शिलकी अंदाजपत्रक व ९० कोटी ३ लाख ९४ हजार ७५ रुपयांचा अर्थसंकल्प मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे यांनी मंजूर केला आहे.

मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे यांच्या उपस्थितीत नगरपरिषदेच्या रहिमतपूर सभागृहात अर्थसंकल्पीय सभा पार पडली. लेखापाल सुप्रिया अडसूळ यांनी २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचे वाचन करताना आरंभीची शिल्लक ४ कोटी ९१ लाख ३४ हजार १५७ रुपये असून, शिलकीसह उत्पन्न ९० कोटी ३ लाख ९४ हजार ७५ रूपयांचा अर्थसंकल्प असल्याचे



सांगितले. नूतन अर्थसंकल्पात भूसंपादनासाठी २० लाख रुपये, शहर स्वच्छता अभियानासाठी १ कोटी ५० लाख, पंधरावा वित्त आयोग २ कोटी, रस्ते विकासासाठी २ कोटी ७० लाख, दलित वस्ती सुधारण्यासाठी २ कोटी, नगरोत्थान चोवीस बाय सातसाठी १२ कोटी ४३ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच घरकुलांसाठीही १० लाखांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. अल्पसंख्याक अनुदान २५ लाख, घनकचरा व्यवस्थापनासाठी ३६ लाख ५० हजारांची तरतूद करण्यात आली आहे.

अर्थसंकल्पात नागरिकांना सोयीसुविधा पुरवण्याचा प्रामुख्याने विचार केला आहे. शहराचा सर्वांगीण विकास करून शहरात स्वच्छता ठेवणे, अमृत २.० पाणीपुरवठा योजनेमुळे शहरात सर्व ठिकाणी योग्य दाबाने पाणीपुरवठा करता येईल. भुयारी गटर योजनेमुळे शहरातील सांडपाण्याचा मार्ग मोकळा होईल. या कामांना विशेष महत्त्व दिले जाणार असल्याचे मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे यांनी सांगितले.

# महाराष्ट्र पुन्हा पुरोगामी बनवूया : डॉ. शरद गायकवाड

सातारा : धर्मांध प्रतिगामी शक्तीला आळा घातला नाही, तर देशाचे ऐक्य धोक्यात येईल. प्रतिगाम्यांचा पोटात मनुस्मृती आणि ओठात संविधान हा कावा ओळखायला हवा. त्यासाठी अहंकार, गटतट, मनभेद अन् मतभेद गाडून सर्वांनी परिवर्तनवादी आणि प्रतिगामी होवू लागलेला महाराष्ट्र पुन्हा पुरोगामी बनवूया, असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. डॉ. शरद गायकवाड यांनी केले.

जकातवाडी, ता. सातारा येथे ७ वे मुक्ता साळवे साहित्य संस्कृती संमेलन पार पडले. यावेळी अध्यक्षस्थानावरुन प्रा. गायकवाड बोलत होते. यावेळी उपराकार प्रा. लक्ष्मण माने, प्रा. पार्थ पोळके, प्रा. सचिन बगाडे, सत्यवान कमाने, उमेश खंडुजोडे, अॅड. संतोष कमाने उपस्थित होते.

प्रारंभी ज्येष्ठ समाजसेविका अनुराधा भोसले यांच्या हस्ते उद्घाटन झाले.



यावेळी प्रा. गायकवाड म्हणाले, लोकशाहीचे चारही स्तंभ खिळखिळीत होवू लागले आहेत. आधुनिक मानवाची वाटचाल आता आदिमानवाकडे सुरु आहे. शिक्षणाचा बाजार मांडला जात असून उद्योगपतींच्या विषारी विळख्यात बहुजनांची शिक्षण व्यवस्था बंदिस्त केली जात आहे. विज्ञानाचा वापर अज्ञान व अंधश्रद्धा पसरवण्यासाठी केला जात आहे. त्यामुळे साहित्यिकांनी आपली लेखणी आणि वाणी सत्ताधारी, जात्यांध, धर्मांधांविरुद्ध, सर्वसामान्यांच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी आणि मानवी मूल्यांच्या जपणुकीसाठी वापरावी.

# शिक्षण महोत्सवातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना लाभले उत्तम व्यासपीठ : तेजस्विनी पाटील

महाबळेश्वर : शिक्षण महोत्सवाच्या - माध्यमातून महाबळेश्वरसारख्या ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मोठे व्यासपीठ प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेली कला तसेच शिक्षकांनी शिक्षणात असलेले नवे बदल, नवीन तंत्र समजावून सांगण्यासाठी मांडलेले नावीन्यपूर्ण शैक्षणिक स्टॉल, ग्रंथदिंडी, चित्ररथ, व्याख्याने, परिसंवाद यांच्या माध्यमातून महाबळेश्वर तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी फायदा होत असल्याचे प्रतिपादन महाबळेश्वरच्या तहसीलदार तेजस्विनी पाटील यांनी समारोप कार्यक्रमप्रसंगी व्यक्त केले.महाबळेश्वर तालुका शिक्षण महोत्सवाच्या सांगता समारंभात त्या बोलत होत्या.मुलांनी मोबाइलचा वापर कमीतकमी करून मैदानी खेळ जास्तीतजास्त खेळावेत तसेच पालकांनीही आपल्या मुलांना इतर बाबींमध्ये व्यस्त ठेवून मोबाइलपासून दूर ठेवण्याचा सल्ला त्यांनी दिला.महाबळेश्वर तालुका शिक्षण महोत्सव दोन दिवस विविध शैक्षणिक उपक्रमांनी साजरा झाला. सांगता समारंभात



तालुक्यातील गुणवत्तापूर्ण शाळा, शिक्षक, विद्यार्थी यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी व्यासपीठावर गटविकास अधिकारी यशवंत भांड, सहायक गटविकास अधिकारी महादेव कांबळे, नायब तहसीलदार शेख मॅडम, विस्तार अधिकारी नामदेव धनावडे, शरद बावळेकर, दीपक बावळेकर, माजी गटशिक्षणाधिकारी मारुती वाशिवले, अभिजित भालेराव, केंद्रप्रमुख दगडू ढेबे, नामदेव धनावडे, संजय पारठे, विनायक पवार, आनंद सकपाळ, चंद्रकांत जंगम, सुरेंद्र भिलारे, वसीम वारुणकर, शिवाजी निकम, संजय संकपाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

सांगता कार्यक्रमात मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमातील तालुकास्तरीय विजेत्या शाळांना पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गुरेघर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भिलार, गिरीस्थान प्रशाला, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पारसोंड, सेंट झेवियर्स हायस्कूल, इलाबेन मेहता विद्यालय, चेतन दत्ताजी गायकवाड हायस्कूल आदी शाळांचा गौरव झाला. राज्यस्तरीय यश संपादन केलेले विद्यार्थी वरद डुबे, शुभंकर ढेबे, आयुष माने या विद्यार्थ्यांचा तर गुणवंत शिक्षक म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिखलीचे विष्णू ढेबे यांनाही गौरविण्यात आले. स्पर्धा परीक्षेत उत्तम यश संपादन करून प्रशासकीय सेवेत गेलेले तालुक्यातील अनिता ढेबे, महेश ढेबे, सबा महापुळे तसेच क्रीडा क्षेत्रात राज्यस्तरावर यश मिळवलेल्या खेळाडूंचाही गुणगौरव झाला. महाबळेश्वर तालुक्यातील शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध सामाजिक संस्थांनी हातभार लावला आहे, त्या सर्व संस्थांनाही सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. गटशिक्षणाधिकारी आनंद पळसे यांनी प्रास्ताविक केले. पुरुषोत्तम माने, संजय संकपाळ यांनी सूत्रसंचालन केले. सुरेंद्र भिलारे यांनी आभार मानले.

# भारतीय बौद्ध महासभेचे आंदोलन

सातारा : बौद्धगया येथील महाबोधी बुद्धविहार व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे. तसेच १९४९ चा कायदा तातडीने रद्द करावा या मागणीसाठी भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

बौद्धगया येथील महाबोधी महाविहार सन १९४९ च्या व्यवस्थापन कायद्यान्वये चालते. परंतु, बिहार राज्यशासन याबाबत दखल घेत नाही. त्यामुळे देशभरातून बौद्ध बांधवांनी संताप व्यक्त केला आहे. गेल्या १८ दिवसांपासून बौद्ध धम्माचे धम्म गुरु पुज्य भंते आणि भिक्कुगण बुध्दगया येथे उपोषण करत आहेत.बुद्धगया महाविहार जगभरातील बौद्धांच्या अस्मितेचा मुद्दा आहे. परंतु व्यवस्थापन हिंदूंच्या ताब्यात असल्याने तेथे हिंदू धर्मानुसार आचरण



केले जाते. महाबोधी महाविहार हे मंदिर नसून ते विहार आहे. सदर महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्या मिळालेच पाहिजे. महाबोधी महाविहा १९४९ चे व्यवस्थापन कायद्यामध् तात्काळ दुरुस्ती करुन त्याच व्यवस्थापन हे बौद्धांच्या हाती देण्या यावे यासाठी आंदोलन करण्या आले.यावेळी चंद्रकांत खंडाईत, सुनील कदम, गणेश कारंडे, अॅड. विजयानं कांबळे, नितीन भोसले, दादासाहेन कांबळे, दिलीप भोसले, सिद्धा वाघमारे उपस्थित होते.

# मलकापुरातील लाभार्थ्यांना २.४२ कोटी निधीचे वाटप

## मुख्याधिकारी प्रताप कोळी यांची माहिती; प्रधानमंत्री आवास योजनेचा २०२ लाभार्थींना फायदा

कराड : मलकापूर नगरपालिकेने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत २०२ पात्र लाभार्थींना २७ फेब्रुवारी २०२५ अखेर २.४२ कोटी निधीचे वाटप केले आहे, अशी माहिती मुख्याधिकारी प्रताप कोळी यांनी दिली.

मलकापूर कार्यक्षेत्रामधील नागरिकांना वेळेत घराचे बांधकाम पूर्ण करुन निधीचा लाभ मिळण्याकामी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव तसेच जिल्हाधिकारी सातारा यांनी वेळोवेळी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने मलकापूर नगरपरिषदेमार्फत कार्यवाही करण्यात आली आहे. याबाबत आमदार अतुल भोसले यांनी आढावा घेऊन मार्गदर्शन केले.

शासनामार्फत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र लाभार्थींना घरकुल बांधण्यासाठी अडीच लाख एवढे आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ही योजना प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी नगरपरिषदेने शासनाच्या निकषानुसार नागरिकांकडून वेळोवेळी प्रस्ताव घेऊन



त्यांना महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत राज्य शासनाच्या शिफारसीने केंद्र शासनाकडून २०२ पात्र लाभार्थींना मान्यता देण्यात आली होती. यापैकी पहिल्या टप्प्यामध्ये १.१२ कोटी निधीचे वितरण करण्यात आले होते. १९ फेब्रुवारी पासून २७फेब्रुवारी अखेर १८५ लाभार्थींना १.३० कोटीचा निधी वाटप केला असून आजपर्यंत या योजनेअंतर्गत एकूण प्रधानमंत्री आवास योजनेचा निधी लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी नगरपरिषदेमार्फत प्रयत्न करण्यात येत आहे.

२.४२ कोटी निधीचे वाटप करण्यात आले आहे.

मलकापूर पालिकेने गेल्या ७दिवसापासून नागरिकांना निधी वाटप करण्याच्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास कक्ष, नगररचना विभाग, बांधकाम विभाग, सामान्य प्रशासन विभाग व कर विभाग या विभागाकडील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्फत लाभार्थींच्या प्रस्तावामध्ये आढळून येणाऱ्या त्रुटींच्या पूर्तता करण्यासाठी विशेष मोहिम हाती घेतली होती. त्यानुसार संबंधित लाभार्थींना प्रत्यक्ष जागेवर भेट देऊन त्रुटी पुर्तता करुन लाभार्थींना निधींचे वाटप करण्यात आले आहे. यामुळे नागरिकांना अपूर्ण इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी मदत होणार आहे.

याबरोबरच ज्या लाभार्थींचे प्रस्ताव तांत्रिक बाबीमुळे अपूर्ण आहेत. त्यांना तांत्रिक मार्गदर्शन देऊन काम पूर्ण करण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सर्वोतोपरी मदत केली जाणार आहे. तसेच नव्याने प्रधानमंत्री आवास योजनेच्या अनुदानासाठी प्रस्ताव दाखल करण्याचे अवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले. याकामी प्रताप कोळी, अभिजीत ढाणे, विनया तांदूळकर, ज्ञानदेव साळुंखे, सुभाष बागल यांचे सहकार्य लाभले.

# खंडाळ्यातील इतर हक्कातील तुकडा नोंदी होणार कमी : तहसिलदार

लोणंद : खंडाळा तालुक्यामध्ये अनेक वर्षापासून सात बारावरील इतर हक्कात लागलेली पोकळीस्त तुकडा नोंदी गावनिहाय कमी केल्या जाणार आहेत. तालुक्यातील ४२ गावांमधील १२ हजार ६९७ गटासंदर्भात आदेश पारीत करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार अजित पाटील यांनी दिली.

याबाबत माहिती देताना तहसिलदार अजित पाटील म्हणाले, खंडाळा तालुक्यामध्ये अनेक वर्षापासून इतर हक्कात लागलेली पोकळीस्त तुकडा नोंद दुरुस्ती, महाराष्ट्र शासनाचे राजपत्र, महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण अधिनियमानुसार सुधारणेच्या दाखल प्रस्तावाबाबत कार्यवाही करण्याबाबत मंडलनिहाय कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पमध्ये सातबाराच्या इतर अधिकारामध्ये असणारा तुकडा शेरा कमी करणे व तुकडा शेरा दुरुस्तीचे कामकाज मोहीम स्वरुपात राबवण्यात आली आहे.

खंडाळा तालुक्यामधील एकूण ४२ गावामधील १२ हजार ६९७ गटा संदर्भात आदेश पारीत करणेत आले आहेत. त्यामध्ये खंडाळा मंडलामधील ४ हजार ६१५ गट, लोणंद मंडलामधील १ हजार २६५ गट, शिरवळ मंडलामधील ५ हजार २६४, वाठार बु. मंडलामधील १ हजार ५५३ एवढ्या गटावरील तुकडा शेरा कमी करण्याबाबत आदेश पारीत करणेत आलेले आहेत.

या आदेशाचा फेरफार घेऊन सातबारावरील अशा नोंदी गावनिहाय कमी केल्या जाणार असल्याचेही पाटील यांनी सांगितले.